सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २४ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ७१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सोन्या- चांदीच्या दरात घसरण

नवी दिल्ली : सोन्या-चांदीच्या किंमतीत सकाळ-सकाळी मोठी घसरण झाली आहे. सोन्याचा दर १४०० रुपयांनी कमी झाला तर, चांदीची चमक ६००० रुपयांनी उतरली आहे. आदल्या दिवशी, सोमवारी, देश-विदेशातील सराफा बाजारात सोने आणि चांदीच्या किंमतीत लक्षणीय वाढ नोंदवली गेली होती, पण मंगळवारी (२३ जून) सकाळी बाजार उघडताच - अवघ्या काही मिनिटांत- ही वाढ धुवून काढली ज्यामुळे खरेदीदारांना दिलासा मिळाला तर गुंतवणूकदारांच्या कपाळावर आठ्या आणल्या. देशांतर्गत इक्विटी बाजारात मंगळवारी सपाट व्यवहार होताना फ्युचर मार्केटमध्ये उलटच घडत आहे. सोन्याचे ऑगस्ट फ्युचर्स १२०० रुपयांनी कमी होऊन १.४६ लाख रुपयांवर घसरले. त्याचप्रमाणे, चांदीचा जुलै वायदा भाव ६००० रुपयांनी घसरला आणि २.२८ लाख रुपयांच्या आसपास व्यवहार करत आहे.

## जिओने केले मालामाल

मुंबई : शेअर बाजारातील गुंतवणूक धोक्याची मानली जाते, पण कोणता स्टॉक कधी गुंतवणूकदारांना श्रीमंत करेल याचा नेम नाही. असाच एक शेअर म्हणजे मुकेश अंबानींची कंपनी, जिओ प्लॅटफॉर्म्स, जो शेअर बाजारात लिस्ट होण्याआधीच गुंतवणूकदारांवर पैशांचा पाऊस पाडत आहे. उद्योगपती महेंद्र नाहाटा याचे सर्वोत्तम उदाहरण आहेत, ज्यांनी १६ वर्षांपूर्वीरिलायन्सला टेलिकॉम क्षेत्रातउतरण्यात मदत केलेली आता आता बक्कळ पैसा कमावण्यासाठी तयार आहेत. नाहटा यांनी जिओ प्लॅटफॉर्म्समध्ये केवळ १० रुपयांना स्टॉक खरेदी केलेला ज्याची किंमत आता १०० पटींहून अधिक वाढली आहे.

## बारा आमदार फुटीर ?

नवी दिल्ली : कर्नाटक विधान परिषद निवडणुकीत भाजप आणि धर्मनिरपेक्षा जनता दल (जेडीएस) पक्षाच्या किमान १२ आमदारांची मते फुटल्याचा संशय भाजप नेत्यांना आहे. भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने हे प्रकरण गांभीर्याने घेताना कर्नाटक प्रदेशाध्यक्ष विजयेंद्र येडियुरप्पा यांच्यासह अनेक नेत्यांना याच आठवड्यात दिल्लीत येऊन राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेण्यास सांगितले आहे.कर्नाटक विधान परिषद निवडणुकीत मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या रणनीतीमुळे सत्ताधारी काँग्रेसने सातपैकी पाच जागा जिंकल्या, तर भाजपला तीन ऐवजी दोनच जागा जिंकता आल्या. १४० आमदार असलेल्या काँग्रेसच्या उमेदवारांना १५१ मते मिळाली, भाजपचे ६४ आमदार असताना त्याच्या उमेदवारांना ५६ मते मिळाली. 'जेडीएस'चे १८ आमदार आहेत, पण मतदानात त्यांची केवळ १४ मते पडली. भाजप आणि 'जेडीएस'च्या फुटीर आमदारांची नावे गुप्त मतदान पद्धतीमुळे उघड करण्यात आलेली नाहीत..

## व्हाट्सअपचा बॉस कुणाल !

मुंबई : मुंबईच्या प्रसिद्ध विल्सन कॉलेजमधून तत्त्वज्ञान विषयात शिक्षण घेणारा एक सामान्य विद्यार्थी आज जगातील सर्वात मोठ्या मेसेजिंग पचा प्रमुख बनला आहे. क्रेड (उठएऊ) चे संस्थापक कुणाल शाह आता थहरींी-ि चे नवे ग्लोबल बॉस झाले आहेत. कोणताही टेक बॅकग्राउंड नसताना त्यांनी मिळवलेले हे यश थक्क करणारे आहे. मुंबईत कॉलेजचे शिक्षण घेतलेल्या कुणाल शाह यांनी भारतीय फिनटेक जगतात आधीच क्रांती घडवली आहे. फ्रीचार्ज आणि क्रेड सारखे मोठे ब्रँड्स उभे केल्यानंतर, आता त्यांच्या खांद्यावर व्हॉट्सपची जागतिक धुरा सोपवण्यात आली आहे. एका भारतीय विद्यार्थ्याचा जागतिक टेक जगताच्या सर्वोच्च पदापर्यंतचा हा प्रवास तरुणांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

# चार महिन्यांत राज्यात २५४ कोटींचे ड्रग्ज जप्त

## प्रत्येक पोलीस ठाण्यात अंमली पदार्थविरोधी पथक उभारणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत ग्वाही

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यात अंमली पदार्थविरोधी (ड्रग्ज) मोहीम अतिशय गतिमान केल्यामुळे जानेवारी ते एप्रिल २०२६ या अवघ्या चार महिन्यांच्या कालावधीत राज्यभरातून तब्बल २५४ कोटी ५३ लाख रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. वाढत्या नार्कोटिक्स आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात 'अंमली पदार्थविरोधी पथक' उभारण्यात येणार असून, ड्रग्जविरोधी लढ्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना विशेष वेतन आणि पसंतीची नियुक्ती दिली जाईल, अशी घोषणा गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत केली. तसेच, ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार ड्रग्ज सापडेल, तिथल्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला जबाबदार धरून त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

विधानसभेत आमदार सुनील प्रभू यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केलेल्या मुद्द्याला उत्तर देताना ते बोलत होते. साताऱ्यात काही दिवसांपूर्वी सापडलेली अंमली पदार्थांची फॅक्टरी नेमकी कुणाची, यावरून विरोधी पक्षातील आमदारांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर बोलताना फडणवीस म्हणाले, देशातील ड्रग्ज रॅकेटचा सर्वात मोठा सूत्रधार 'सलीम डोला' याला आपण रेड कॉर्नर नोटीस काढून नुकतीच अटक करून भारतात आणले आहे. मुंबई पोलिसांनी अत्यंत कौशल्याने त्याला आणि त्याच्या १२ हस्तकांना बेड्या ठोकल्या. या एकाच व्यक्तीने महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा या चार राज्यांमध्ये एमडीचे कारखाने उभे करून तब्बल ४ हजार किलो एमडीची निर्मिती आणि विक्री केली होती, ज्यातील बहुतांश साठा आपण हस्तगत केला आहे. साताऱ्यातील ती फॅक्टरीही आपलीच असल्याचे त्याने चौकशीत मान्य केले असून, ड्रग्ज रॅकेट मोडण्यात पोलिसांना हे मोठे यश मिळाले आहे.





तत्पूर्वी, आमदार सुनील प्रभू यांनी मुंबईसह राज्यातील गल्लीबोळात होणाऱ्या ड्रग्ज विक्रीवर प्रश्न उपस्थित केला.

सरकार 'ड्रग्ज फ्री मुंबई' मोहीम आणत असले, तरी लोकप्रतिनिधींनी माहिती देऊनही स्थानिक पोलीस ठाण्यांकडून तात्काळ कारवाई होत नाही. ही चेन तोडण्यासाठी स्थानिक पातळीवर झिरो टॉलरन्सची भूमिका घ्यावी लागेल, अशी मागणी त्यांनी केली. या चर्चेत आमदार योगेश सागर, जयंत पाटील, नितीन राऊत आणि राजेश क्षीरसागर यांनीही भाग घेतला. आमदार जयंत पाटील यांनी ऑनलाईन ड्रग्ज पुरवठा आणि इंजेक्शनद्वारे ड्रग्ज घेणाऱ्या तरुणांचा मुद्दा उपस्थित करत, बंदरांवर पाळत ठेवण्याची आणि ड्रग्ज रॅकेटमध्ये सामील असलेल्या पोलिसांना तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, जानेवारी ते एप्रिल २०२६ दरम्यान राज्यात ड्रग्जप्रकरणी १ हजार १४२ गुन्हे दाखल झाले असून १ हजार ६२६ आरोपींना अटक करण्यात आली. तर ड्रग्ज सेवन करणाऱ्यांविरुद्ध ३ हजार १९९ गुन्हे नोंदवले गेले आहेत.

आता केवळ ड्रग्ज साठ्यापुरती कारवाई न करता त्याचे 'मागचे आणि पुढचे दुवे' शोधले जात आहेत. २५ मे २०२६ रोजी आग्रीपाड्यात झालेल्या कारवाईवरून प्रयोगशाळा शोधून ५० कोटींचे मॅफेड्रोन जप्त केले, तर साकीनाका येथील तस्करावरून गुजरातच्या कारखान्यावर धाड टाकून ७४ कोटींचा माल जप्त करण्यात आला. ड्रग्ज तस्करांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आर्थिक हितसंबंध आढळलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना तडकाफडकी बडतर्फ करण्यात आले आहे. वर्ष २०२५ मध्ये ५२३.१७ कोटींचे ड्रग्ज नष्ट करण्यात आले. केंद्र सरकारच्या नवीन नियमानुसार, जप्त केलेला माल तात्काळ कोर्टाच्या परवानगीने एकाच दिवशी जाळला जातो, जेणेकरून तो पुन्हा बाजारात येणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# राज्यात २४ ते २७ जून दरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता

तभा वृत्तसेवा

मुंबई : भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्यात मान्सून सक्रिय होण्यासाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली असून २४ ते २७ जूनदरम्यान कोकण किनारपट्टीसह राज्यातील अनेक अंतर्गत भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मुंबईत सकाळपासूनच पावसाने चांगलाच जोर धरला असून शहराच्या बहुतांश भागांत संततधार पाऊस सुरू आहे. दक्षिण मुंबईसह उपनगरांमध्येही पावसाची जोरदार हजेरी पाहायला मिळत आहे. पावसाचा वाढता जोर लक्षात घेता मुंबईत मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा प्रादेशिक हवामान केंद्राकडून होण्याची शक्यता आहे. तसेच पुढील दोन ते तीन दिवस शहरात चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून जुलैच्या पहिल्या आठवड्यातही मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.



मुंबईतील सायन परिसरात सकाळच्या गर्दीच्या वेळी एक बेस्ट बस रस्त्यात बंद पडल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आणि मोठी कोंडी निर्माण झाली. दिवसभर ढगाळ वातावरणासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू राहण्याची शक्यता असून पुढील चोवीस ते अठ्ठेचाळीस तासांसाठी हवामान विभागाने पिवळा इशारा जारी केला आहे.

# मंत्र्यांच्या अनुपस्थितीवरून सत्ताधारी-विरोधकांमध्ये जुंपली

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी मंत्र्यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा विधानसभेत चांगलाच गाजला. संबंधित खात्यांचे मंत्री सभागृहात नसताना त्यांच्या वतीने इतर मंत्री किंवा राज्यमंत्री उत्तरे देतील, अशी घोषणा अध्यक्ष नार्वेकर(परीुशझरी) यांनी केली. विरोधकांनी त्यावर आक्षेप घेतल्याने सत्ताधारी बाकांवरूनही त्यांना प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे सत्ताधारी - विरोधक आमने सामने आल्याने एकच गोंधळ उडाला. विरोधकांनी सरकारच्या कार्यपद्धतीचा निषेध करत सभात्याग केला.विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विविध मंत्र्यांच्या खात्यांचा कारभार अधिवेशनादरम्यान इतर मंत्र्यांकडे सोपविण्यात आल्याची माहिती सभागृहात दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी तीव्र आक्षेप घेतला. संबंधित खात्याचे मंत्रीच: सभागृहात उपस्थित नसेल, तर सदस्यांच्या प्रश्नांना न्याय कसा मिळणार, असा सवाल त्यांनी केला. खात्याचे मंत्री चर्चेला उत्तर देणार नसतील, तर ही जबाबदारी टाळण्यासारखी बाब आहे, असे सांगत अध्यक्षांनी केलेली घोषणा मागे घेण्याची मागणी त्यांनी केली. तर काँग्रेसआमदार विजय वडेट्टीवारयांनी, पूर्वी अपवादात्मक परिस्थितीत अशी व्यवस्था केली जात होती. मात्र आता ही प्रथा बनली आहे. संबंधित मंत्री सभागृहात नसताना दुसऱ्यांनी उत्तर दिल्यास काय अर्थ राहतो? असा सवाल केला. सरकार सभागृहाला गांभीर्याने घेत नाही, असा गंभीर आरोप करताना बहुमताच्या जोरावर नियमांची सोयीनुसार व्याख्या केली जात असल्याची टीकाही त्यांनी केली.विरोधकांच्या आक्षेपांना उत्तर देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी संविधानातील अनुच्छेद १६४ चा दाखला दिला. मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी हे संसदीय लोकशाहीचे मूलतत्त्व असल्याने कोणताही मंत्री सरकारच्या वतीने उत्तर देऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. ही व्यवस्था नवी नसून २०१९ - २० मध्येही अशीच पद्धत अवलंबली गेली होती, असे सांगत त्यांनी विरोधकांचे आक्षेप फेटाळले.



# इराणचा दावा :होर्मुझवर फक्त आमचंच नियंत्रण !

वृत्तसंस्था

तेहरान : इराणने होर्मुझ सामुद्रधुनीसाठी एक 'हॉटलाइन' आणि केंद्र स्थापन करण्याची घोषणा केली आहे, जे कोणत्याही घटनेवर ३० दिवसांत जलदगतीने तोडगा काढेल. त्याचप्रमाणे, अमेरिकेने गोठवलेला १२ अब्ज डॉलर्सचा निधी मुक्त करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचेही इराणने सांगितले असून यापुढे होर्मुझ सामुद्रधुनी त्यांच्या कायद्यांनुसार आणि नियमांनुसार शासित होईल, याचा इराणने पुन्हा एकदा पुनरुच्चार केला.मध्यपूर्वेतील युद्धाला विराम लावत अमेरिका आणि इराणने शांतता करारावर स्वाक्षरी केली. यासोबत ६० दिवसांची वाटाघाटीही सुरू झाली, ज्याबाबत आता दोन्ही पक्षांची विधाने समोर येऊ लागली आहेत. अमेरिका आणि इस्रायलसोबत संघर्षात होर्मुझची सामुद्रधुनी इराणची सर्वात मोठी 'ढाल' बनली होती आणि आता तेहरान या जलमार्गावरील आपले वर्चस्व सोडायला तयार नाही, जे पुन्हा एकदा त्यांच्या विधानातून स्पष्ट झाले आहे. अमेरिकेसोबत वाटाघाटींदरम्यानइराणने स्ट्रेट ऑफ होर्मुझबद्दलएक मोठी घोषणा केली आहे. जागतिक व्यापारासाठी महत्त्वाच्या अशा या मार्गावर घडणाऱ्या कोणत्याही घटनांचे त्वरित निराकरण करण्यासाठी एक केंद्र आणि 'टेलिफोन हॉटलाइन' सुरू करण्याची तेहरानचे सर्वोच्च वाटाघाटीकार मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी घोषणा केली.ही व्यवस्था ३० दिवसांच्या कालावधीसाठी लागू राहील, असे त्यांनी पुढे सांगितले. तसेच अमेरिकेने गोठवलेला १२ अब्ज डॉलर्सचाइराणचा निधी मुक्त करण्याच्याप्रक्रियेवर स्वाक्षरी करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. होर्मुझ सामुद्रधुनीवर इराणी कायदे आणि तेथील प्रस्थापित प्रणालीनुसारच कारभार चालवला जाईल, हेही गालिबाफ यांनी स्पष्ट केले. होर्मुझ सामुद्रधुनीतील कोणत्याही घटना त्वरित सोडवण्यासाठी एक केंद्र आणि टेलिफोन हॉटलाइन उभारली जाईल, जी ३० दिवसांच्या कालावधीत उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्या त्वरित सोडवेल, असे स्वित्झर्लंडमधील वाटाघाटींनंतर सोमवारी परतताना इराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांशी बोलताना, इराणचे मुख्य वार्ताकार मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी सांगितले. या निर्णयामुळे तेल निर्यातीवर अवलंबून असलेल्या प्रादेशिक अर्थव्यवस्थेला मदत होऊ शकते, असे गालिबाफ म्हणाले.इराणी संसदेचे अध्यक्ष गालिबाफ यांनी सांगितले की, होर्मुझ सामुद्रधुनी आता 'इराणच्या व्यवस्थापनाखाली' चालवली जाईल आणि 'युद्धापूर्वीच्या स्थितीत कधीही परतणार नाही.' तसेच इराण 'आंतरराष्ट्रीय कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करेल' असेही त्यांनी पुढे नमूद केले आणि या जलमार्गावर उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्वरित पावले उचलेल.



# अलका याज्ञिक पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना भारतीय संगीत आणि चित्रपटसृष्टीतील त्यांच्या अमूल्य योगदानासाठी पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती भवन येथील सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.



१९९० आणि २००० च्या दशकात त्यांनी अगणित हिट गाणी हिंदी चित्रपटसृष्टीला दिली आहेत. 'खलनायक', 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे', 'ताल' यांसारख्या एकापेक्षा एक चित्रपटांमधील अविस्मरणीय गाण्यांना आपला स्वरसाज दिला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी राष्ट्रपती भवनात आयोजित दुसऱ्या नागरी सन्मान सोहळ्यात पद्म पुरस्कार प्रदान केले. यामध्ये एकूण ६५ पद्म पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये २ पद्म विभूषण, ७ पद्म भूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश होता.पुरस्कारार्थींमध्ये गायिका अलका याज्ञिक, अभिनेते ममूटी, क्रिकेटपटू रोहित शर्मा आणि आर. माधवन यांचा समावेश आहे. अलका याज्ञिक या हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक लोकप्रिय पार्श्र्वगायिकांपैकी एक मानल्या जातात. गेली अनेक दशके त्यांनी आपल्या मधुर आवाजाने कोट्यवधी संगीतप्रेमींची मने जिंकली आहेत.

अलका याज्ञिक यांनी त्यांच्या कारकिर्दीत हजारो गाण्यांना आपला आवाज दिला आहे. त्यांच्या अनेक गाण्यांनी लोकप्रियतेचे विक्रम प्रस्थापित केले आहेत. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या अलका याज्ञिक यांच्या नावावर अनेक प्रतिष्ठित पुरस्कार आहेत.

पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाल्यानंतर अलका याज्ञिक यांनी हा सन्मान अत्यंत नम्रतेने स्वीकारला.

# २१००० कर्मचारी बेरोजगार, दिग्गज IT कंपनीकडून नोकर कपातीचा सपाटा

वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : एआयचा अट्टाहास अख्ख्या जगाला चांगलाच महागात पडताना दिसत आहे. अमेरिकी आयटी बाजारात मोठा धमाका झाला आहे. ओरॅकल -ख आणि क्लाउड व्यवसायावर आपले लक्ष वेगाने वाढवत असून आयटी क्षेत्रातील दिग्गज ओरॅकलने २१,००० कर्मचाऱ्यांची हकालपट्टी केल्याचे समोर आले आहे.

आर्टिफिशिअल इंटेलिजन्समुळे जगभरातील कार्यपद्धतींमध्ये वेगाने बदल घडून येत आहे. -ख च्या मदतीने कंपन्या खर्च कमी करण्याचा आणि कामाचा वेग वाढवण्याचा प्रयत्न करत असून त्याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवरही जाणवू लागला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या काळात खढ कंपन्या सातत्याने नोकर कपात करत असून मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांनी हकालपट्टी केली जात आहे. या दरम्यान, जगातीलआघाडीच्या सॉफ्टवेअर कंपन्यांपैकीओरॅकलने गेल्या वर्षभरात अंदाजे २१००० कर्मचाऱ्यांची कपात केल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. -ख च्या वाढत्या वापरामुळे अनेक कामे अधिक वेगाने आणि कमी संसाधनांमध्ये पूर्ण करणे शक्य होत आहे, ज्यामुळे काही विशिष्ट पदांची गरज कमी होत असल्याचे कंपनीने म्हटले.आर्थिक वर्ष २०२६ मध्ये आतापर्यंत ओरॅकलमधील कर्मचाऱ्यांची संख्या अंदाजे १.६२ लाखांवरून १.४१ लाखांपर्यंत कमी झाली आहे, म्हणजे केवळ १२ महिन्यांत २१,००० कर्मचारी कमी झाले. या कपातीमुळे कंपनीला अंदाजे १.८ अब्ज डॉलर्सचा खर्चही आला, पण तरीही कंपनीने आपल्या व्यवसाय आणि महसुलात जोरदार वाढ अनुभवली आहे.गेल्या काही वर्षांपासून ओरॅकलने एआय आणि क्लाउड तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. ज्या कामांसाठी पूर्वी मोठ्या कर्मचाऱ्यांची आवश्यकता होती, ती अनेक कामे नवीन तंत्रज्ञान हाताळू शकते, असे कंपनीचे म्हणणे असून यामुळेच कंपनीने काही विभागांमधील कर्मचाऱ्यांना कायमचा रामराम ठोकला.




मे २०२५ पर्यंत ओरॅकलचे अमेरिकेत तब्बल ४९,००० कर्मचारी कार्यरत असून ९२,००० कर्मचारी इतर देशांमध्ये काम करत आहेत. अशाप्रकारे, कंपनीची एकूण कर्मचारी संख्या आता २०२२ मध्ये उशीपशी च्या अधिग्रहणापूर्वीच्या पातळीच्या खाली आली आहे.

२०२२ मध्ये ओरॅकलने उशीपशी ला अंदाजे २८ अब्ज डॉलर्सइतकी किंमत मोजून कंपनीचा ताबा मिळवलेला आणि हजारो नव्या कर्मचाऱ्यांची भरती केली होती, पण अलीकडच्या लेऑफमुळे कर्मचाऱ्यांच्या संख्येत पुन्हा कमी आली आहे.दरम्यान, केवळ ओरॅकलच नव्हे तर इतरही बड्या-बड्या आयटी कंपन्यांनी हजारोंच्या संख्येत नोकर कपात केली आहे. मार्क झुकरबर्गच्या मालकीची चर्शींर देखील एआयच्या शर्यतीत आघाडी घेण्याच्या दिशेने वागेन पावले उचलत असून यासाठी कंपनीने मे २०२६ मध्ये कंपनीने अंदाजे ८००० कर्मचारी कमी केले इतर हजारो कर्मचाऱ्यांच्या भूमिका बदलल्या.

## गोपेवाडी फाटा पाटेगांवला ऑनलाईन चक्री जुगार

**तभा वृत्तसेवा**

**पैठण दि २३ :-** पैठण जवळील गोपेवाडी फाटा तसेच पाटेगांव चढावर ऑनलाईन चक्री जुगाराच्या दुकाना थाटल्या असून याठिकाणी सराईत गुंडाकडून पैसे लावून आकड्यांचा जुगार चालवला जात आहे. संवेदनशील असलेल्या वडवाळी जवळील गोपेवाडी फाट्यावर पैठण शहरातील तसेच शेवगावच्या सराईत गुंडाकडून पत्राच्या गाळ्यात ऑनलाईन चक्री जुगार चालवण्यात येत असून याठिकाणी सर्व सामान्य शेतकरी आणि विद्यार्थी वर्गाची लूट केली जात आहे. असाच प्रकार पाटेगांव चढावर सुरु असून याठिकाणी गाळ्यात नगर जिल्ह्यातील टोलक्याकडून जुगार चालवला जात आहे. याप्रकरणी पैठण पोलिसांनी एम.आय.डी.सी पोलिसांप्रमाणे कारवाई करावी अशी मागणी गांवकऱ्यांनी केली आहे.



## नोव्हा सिरीजचा विस्तार करत नोव्हा2 प्रो 5जी आणि नोव्हा2 प्रो 5जी चे सादरीकरण

**छत्रपती संभाजीनगर :** एआय+ स्मार्टफोन्स ने आज 'नोव्हा 2 निओ 5जी' आणि 'नोव्हा 2 प्रो 5जी' सादर केले आहे. या नवीन मॉडेल्समुळे कंपनीच्या 'नोव्हा सिरीज' 'चा विस्तार झाला असून, भारतीय ग्राहकांना विश्वासार्ह, सुलभ आणि उत्कृष्ट कामगिरी देणारे स्मार्टफोन अनुभव पुरवण्याची त्यांची वचनबद्धता अधिक दृढ झाली आहे. डिझाइन, विश्वासार्हता आणि पारदर्शकता या समान तत्त्वांवर आधारित असूनही, वेगवेगळ्या वापरकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले नोव्हा2 निओ 5जी आणि नोव्हा2 प्रो 5जी हे स्मार्टफोन्स हे नोव्हा अनुभव एका व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचवतात, यामध्ये पहिल्यांदाच स्मार्टफोन वापरणारे ग्राहक आणि किंमतीचा विचार करणारे ग्राहक ते कंटेंट क्रिएटर्स, व्यावसायिक आणि उत्तम कामगिरीला प्राधान्य देणारे ग्राहक यांचा समावेश आहे.

## सुमीतइंडस्ट्रीज मोठी घोषणा

**छत्रपती संभाजीनगर :** एकात्मिक पॉलिस्टर उत्पादन क्षेत्रातील आघाडीची कंपनी सुमीत इंडस्ट्रीजलिमिटेडने आपल्या व्यवसाय विस्तार आणि आर्थिक बळकटीसाठी 199.75कोटींच्या इश्यूची घोषणा केली आहे. कंपनीने पात्र भागधारकांसाठी हा इश्यू आणलाअसून त्यातून उभारण्यात येणारा निधी उत्पादन क्षमता वाढ, कर्ज कमीकरणे,कार्यकारी भांडवल मजबूत करणे आणि सौर ऊर्जा प्रकल्पउभारण्यासाठी वापरण्यात येणार आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने 16.84 कोटीपूर्णतः भरलेल्या इक्विटी शेअर्सच्या माध्यमातून 199.75 कोटीउभारण्यास मंजुरी दिली आहे. या इश्यूद्वारे कंपनीची आर्थिक लवचिकता वाढविणे आणिदीर्घकालीन वाढीच्या योजनांना गती देणे हा मुख्य उद्देश आहे.

## गोदरेज अग्रोव्हेट हिटवीड मॅक्सवर विशेष ऑफर

छत्रपती संभाजीनगर – देशात कृषी व अन्न क्षेत्रात अग्रगण्य कंपनी म्हणून नावाजलेल्या गोदरेज अग्रोव्हेट लिमिटेड कंपनीने कापूस उत्पादक शेतक-यांसाठी नवी घोषणा केली आहे. गोदरेज अग्रोव्हेट लिमिटेड कंपनीने कापूस उत्पादक शेतक-यांसाठी “हिटवीड मॅक्स’ या निवडक तणनाशकावर खास कॅशबॅक ऑफर जाहीर केली आहे. कापूस पिकाच्या वाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यातच शेतक-यांनी प्रभावी तणव्यवस्थापन करावे, हा यामागील उद्देश आहे. या योजनेंतर्गत हिटवीड मॅक्स खरेदी करणा-या शेतक-यांना खात्रीशीर कॅशबॅक बक्षीस स्वरुपात दिले जाईल.

## प्रकाशकांनी 30 जून पर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावे, विवरणपत्र दाखल न केल्यास दहा हजारांचा दंड

**छत्रपती संभाजीनगर दि.२३ :** प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र प्रेस सेवा पोर्टल वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळविले आहे.

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांनी ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन दाखल करावे. या मुदतीनंतर विवरणपत्र सादर न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असेही प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांमध्ये नमूद केले आहे.

## माधव शिंदे यांचे निधन



**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.२३ जून :** तालुक्यातील जरंडी येथील माधव झिपरू शिंदे(वय.७५) यांचे सोमवारी (दि.२२)सकाळी आठ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या वर दुपारी तिनला अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा असा परिवार आहे.येथील व्यावसायिक कडूबा पाटील (डोलारे) यांचे ते मामा होते.

# महानगरांच्या पलीकडे साकारला जातोय भारतातील गृहनिर्माणाचा पुढील टप्पा : प्रदीप बी.

छत्रपती संभाजीनगर - प्रदीप बी., बिझनेस हेड -उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक, गृहनिर्माण आणि कमी रकमेचे तारण कर्ज यांच्या मते भारतातील लहान शहरे आणि नगरांमध्ये, स्वतःचे घर असण्याचे स्वप्न आता केवळ एक महत्त्वाकांक्षा राहिलेली नाही; तर ती एक तातडीची गरज, अत्यंत वैयक्तिक आणि अनिवार्य अशी बाब ठरली आहे.घर घ्यायचं म्हटलं की, कायम मोठ्या शहरांचाच विचार होतो. असे असले तरी विकासाचे पुढील पर्व आता टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये आकारास येत आहे; जिथे सुविधांच्या उपलब्धतेपेक्षा लोकांच्या आकांक्षा अधिक वेगाने वाढत आहेत.

भारतात अजूनही घरांची मोठी कमतरता भासत आहे, विशेषतः परवडणाऱ्या घरांच्या श्रेणीमध्ये. २०२४ मधील सीआयआय-नाइट फ्रँक इंडिया अहवालानुसार, सध्या ही तूट १ कोटी घरांची आहे आणि २०३० पर्यंत ती ३ कोटींहून अधिक होण्याची शक्यता आहे.

त्याच वेळी, मागणीचे स्वरूपही बदलते आहे. वाढते खर्चयोग्य उत्पन्न, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि कोरोनानंतरचे स्थलांतर यामुळे आता ६०-६५% हून अधिक गृहनिर्माण मागणी ही टियर २ आणि टियर ३ शहरांमधून येत आहे. या मागणीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्यांदाच घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत झालेली वाढ हे आहे.

या मार्केटमधील परवडणाऱ्या घरांचा विभाग वैविध्यपूर्ण आहे; यात करिअरच्या सुरुवातीच्या टप्प्यावर असलेले पगारदार कर्मचारी, व्यावसायिक आणि लघु-उद्योजक यांचा समावेश होतो.

यामध्ये प्रामुख्याने दिसून येणारी बाब म्हणजे लोकांच्या जीवनशैलीशी संबंधित वर्तणुकीत झालेला बदल. २०२६ पर्यंत यात लक्षणीय बदल झाला असून, पहिल्यांदाच घर खरेदी करणाऱ्यांपैकी ६४% ग्राहक आता ३५ वर्षाखालील वयोगटातील आहेत; याउलट २०१९ मध्ये हे प्रमाण केवळ ३८% होते. ग्राहक आता लहान वयात घर खरेदी करण्यास पसंती देत आहेत आणि अनेकदा कुटुंब सुरू करण्याच्या काळातच हा निर्णय घेतला जात आहे. त्यामुळे, घरमालक होणे ही आता दूरची किंवा भविष्यातील घटना न राहता, जीवनातील एक महत्त्वाची पायरी ठरते आहे.

घरे कशा प्रकारे घेतली जातात, हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. मोठ्या विकासकांचे वर्चस्व असलेल्या महानगरांमधील मार्केटच्या तुलनेत, टियर-२ आणि टियर-३ क्षेत्रातील ग्राहक स्वतः बांधलेल्या घरांना - जी अनेकदा टप्प्याटप्प्याने बांधली जातात किंवा ओळखीच्या परिसरातील तयार घरांना पसंती देतात. आकडेवारीवरून असेही दिसून येते की, भारतातील गृहकर्जांपैकी मोठा हिस्सा २५ लाख रुपयांपेक्षा कमी रकमेच्या श्रेणीतील आहे; यावरून परवडणाऱ्या घरांची मागणी अधोरेखित होते.

जसजशी मागणी बदलते आहे आणि इकोसिस्टीम विकसित होते आहे, तसतशी स्पर्धात्मक तीव्रता झपाट्याने वाढत आहे. मोठ्या व्यावसायिक बँका त्यांच्या बाजारपेठेत त्यांची उपस्थिती वाढवत आहेत, ज्यांना ते एकेकाळी फार महत्त्वाचे मानत नव्हते. या दरम्यान फिनटेक-समर्थित NBFC तंत्रज्ञानाचा लाभ घेत आहेत आणि ग्राहक अनुभवासाठी नवीन बेंचमार्क सेट करत आहेत. या वातावरणात, वेग आणि विस्तार याद्वारेच नाही, तर सेवेच्या गुणवत्तेद्वारे आणि समुदायांसोबत वेळोवेळी निर्माण झालेल्या विश्वासाच्या आधारे आपले वेगळेपण दाखवावे लागेल. दीर्घकाळापासून मार्केटमध्ये लक्षणीय उपस्थिती नसलेल्या संस्थांनी तातडीने हालचाल केल्यास त्यांना येथे रचनात्मक फायदा होऊ शकतो.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने गृहनिर्माण पोर्टफोलिओत सातत्यपूर्ण गती दर्शविली आहे, अलीकडेच थकबाकीच्या मुद्दलात ₹१०,००० कोटींचा टप्पा पार केला आहे. या प्रकारची वाढ - मोजमाप, समाजाच्या विश्वासावर रुजलेली आणि विकसित होत असलेल्या डिजिटल क्षमतांद्वारे समर्थित दीर्घकालीन परवडणारी घरे वित्त स्केलवर कशी असू शकतात हे दर्शवते.

ही वाढ उत्पादनासाठी नव्हे तर ग्राहकांसाठी डिझाइन करण्यावर आमचे लक्ष केंद्रित करण्याचे उप-उत्पादन आहे.

भारतातील गृहनिर्माण बाजारपेठ ही स्थानिक आहे, हे ओळखून राज्यवार आणि प्रदेश-विशिष्ट धोरणांचा अवलंब करणे हा एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहे. जमीन शीर्षके, मालमत्तेची रचना आणि दस्तऐवजीकरणातील फरकांना जोखीम व्यवस्थापन आणि ग्राहक समावेशन दोन्ही सक्षम करण्यासाठी तयार केलेल्या फ्रेमवर्कची आवश्यकता असते.

या एवढेच गंभीर आमचे अंडररायटिंग आहे. सेमी फॉर्मल आणि गैर-रेखीय उत्पन्न प्रवाहाचे मूल्यांकन करण्याचा सखोल अनुभव असलेल्या संस्था या विभागाला जबाबदारीने सेवा देण्यासाठी अधिक चांगल्या स्थितीत आहेत, तेही वास्तविक कमाई क्षमता समजून घेण्यासाठी कठोर दस्तऐवजीकरणाच्या पलीकडे जाऊन.

## छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अपघातांची तिहेरी घटना

**तभा वृत्तसेवा**

फर्दापूर दि 23 .छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात वेगवेगळ्या अपघातांच्या तीन घटना मंगळवारी सकाळी दहा वाजता एम पी 09 एच एच 1606 हा खंडवा हुन छत्रपती संभाजीनगर कडे घाटातून जात असताना ट्रक मध्ये बिघाड झाल्याने हा ट्रक वळणावर बंद पडल्याने घाटात अडचण येत होती तर दुसरा अपघात घोड पटांगणाच्या वळणावर झाला यामध्ये एक कार आणि कंटेनर मध्ये समोरासमोर झाला असून यात कार चे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

गाडीतील प्रवाशी किरकोळ जखमी झाले होते यामध्ये कार क्रमांक एम एच 40 ऐ सी 7058 कंटेनर क्रमांक के ऐ 56ऐ 0062 या अपघातानंतर या वळणावर थोड्या फार प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.





तिसरा अपघात गोवा हून पंजाब ऐसी चा माल घेऊन जाणारा कंटेनर क्रमांक यु के ओ बी सी बी 0362 याचे घाट उतरताना ब्रेक निकामी झाले असल्याने या चालकाने प्रसंगावधान राखून कंटेनर हा डोंगराच्या कड्यावर आदळला असुन या कंटेनरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पुर्ण केबीन फुटली असल्याने यातून चालक किल्नर सुखरूप बाहेर आले असून यांना हि किरकोळ दुखापती झाली आहे या तिन्ही अपघात झाल्या बरोबर फर्दापूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी आकाश गवळे, फिरोज तडवी मदतनीस केदार पवार यांनी तात्काळ घाटात जाऊन वाहतूक कोंडी सुरळीत करुन या अपघात ग्रस्त गाड्या खाली आणण्यात आल्या.

## 'घबाडकुंड' च्या अभूतपूर्व यशानंतर मराठी युनिव्हर्सच्या दुसऱ्या अध्यायासाठी 50 कोटींची भव्य गुंतवणूक

छत्रपती संभाजीनगर - मराठी चित्रपटसृष्टीत ‘द फर्स्ट मराठी युनिव्हर्स’ची संकल्पना 'घबाडकुंड' चित्रपटाद्वारे यशस्वीपणे साकारत नवा इतिहास रचणाऱ्या आयकॉन डी स्टाईल एंटरटेन्मेंट अँड लाइफस्टाईल प्रा. लि.ने आता मराठी युनिव्हर्सच्या दुसऱ्या अध्यायाची अधिकृत तयारी सुरू केली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी कंपनी तब्बल ५० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याची घोषणा निर्माते डॉ. रसिक कदम यांनी केली.

मराठी सिनेमात एक वेगळे आणि व्यापक सिनेमॅटिक विश्व निर्माण करणाऱ्या 'घबाडकुंड' या चित्रपटाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या यशामुळे मराठी चित्रपटसृष्टीत फ्रँचायझी-आधारित कथानकांना नवे दालन खुले झाले आहे. याच यशाच्या बळावर आता मराठी युनिव्हर्सचा दुसरा अध्याय अधिक भव्य, तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक आणि जागतिक दर्जाचा सिने-अनुभव घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

याविषयी बोलताना डॉ. रसिक कदम म्हणाले, "मराठी चित्रपटसृष्टीला केवळ स्वतंत्र यशस्वी चित्रपटांची नव्हे, तर दीर्घकालीन सिनेमॅटिक फ्रँचायझीची आवश्यकता आहे. 'घबाडकुंड' हा त्या स्वप्नाच्या पूर्ततेकडे टाकलेला पहिला महत्त्वाचा टप्पा होता. आता दुसऱ्या अध्यायासाठी ५० कोटी रुपयांची गुंतवणूक करून आम्ही मराठी सिनेमाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळवून देण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत आहोत."

या नव्या प्रकल्पाचे कथानक, कलाकार, तंत्रज्ञ आणि निर्मितीशी संबंधित इतर महत्त्वाच्या बाबींची अधिकृत घोषणा लवकरच करण्यात येणार आहे. प्रेक्षकांना यावेळी अधिक व्यापक, रोमांचकारी आणि उच्च दर्जाच्या दृश्य अनुभवाची मेजवानी मिळणार असून, मराठी सिनेमासाठी हे एक नवे आणि ऐतिहासिक पर्व ठरणार असल्याचा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला आहे.

मराठी चित्रपटसृष्टीला जागतिक स्तरावर नेण्याच्या ध्येयाने साकार होणारा हा प्रकल्प आगामी काळात उद्योगक्षेत्र आणि प्रेक्षक या दोघांसाठीही अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

## सोयगाव येथे जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या हस्ते महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.२३ जून :** सोयगाव येथे साने हॉस्पिटल शेंदुर्णी व भारतीय जनता पार्टीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सुमारे १५० महिलांनी सहभाग घेऊन आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.



यावेळी डॉ.कल्पक साने,डॉ. मयुरी सानप,तेजस्विनीताई काळे,सरपंच नंदाताई आगे,डॉ. स्वाती काळे,सोयगाव भाजपा तालुका अध्यक्ष संजय पाटील,माजी नगराध्यक्ष कैलास काळे,जिल्हा चिटणीस सुनील गावंडे,शहराध्यक्ष मंगेश सोहनी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर मयूर मनगटे, संजीवन सोनवणे,गजानन पवार,विजय गव्हाड,महेश मानकर,सुनील ठोंबरे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांनी महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.ग्रामीण भागातील महिलांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनासह दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी,या उद्देशाने अशा शिबिरांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. शिबिरात महिलांची विविध आरोग्य तपासणी करण्यात आली.तसेच स्त्रीरोग,पोषण,रक्तक्षय,मातृ आरोग्य व इतर आरोग्यविषयक समस्यांबाबत तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.सुमारे १५० महिलांनी शिबिराचा लाभ घेतल्याने हा उपक्रम यशस्वी ठरला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी साने हॉस्पिटल व सर्व सहकार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी भविष्यातही असे उपक्रम राबविण्याची अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## अग्रसेन विद्या मंदिर शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



इटखेडा - पैठण रोड येथील अग्रसेन विद्या मंदिर शाळेत दि. २१/०६/२०२६ रोजी १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेचे प्राचार्य श्री. संतोष कुमार करवा, उपप्राचार्या मयुरी लोगलवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध ऱ्हिदमिक व अर्टीस्टिक योगाचे प्रात्यक्षिक सादर करून सर्वांची मने जिंकली. याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी क्रीडा शिक्षक डॉ. कैलास शिवणकर, सोनी खरात व करिश्मा मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आसने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रात्यक्षिक केले. शाळेच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रत्येकाला निरोगी जीवन जगण्यासाठी योग तसेच प्राणायामाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाच्या शिस्तबद्ध आयोजनासाठी शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा व उपप्राचार्या मयुरी लोगलवार यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन सर्व विभागांचे विभाग प्रमुख, इव्हेंट विभागप्रमुख विक्रम शर्मा यांनी केले. कार्यक्रमाच्या संपन्नतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अविरत परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शाळेचे शिक्षक रवीद्र माळी यांनी तर आभार प्रदर्शन अभिजीत शिंदे यांनी केले. शाळेचे शिक्षक प्रदीप भोगावकर यांच्या मंत्रमुग्ध गायनाद्वारे कार्यक्रमाची सांगता झाली.

## संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी 'डिजिटल हयात प्रमाणपत्र' बंधनकारक

### सत्यापन ॲप किंवा सेतू सुविधा केंद्रच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर,दि.२३ - संजय गांधी योजना (शहर विभाग), छत्रपती संभाजीनगर यांच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'संजय गांधी निराधार योजना' आणि 'श्रावणबाळ वृद्धपकाळ निवृत्तीवेतन योजने'च्या सर्व लाभार्थ्यांनी आपले हयात प्रमाणपत्र (Digital Life Certificate) केवळ 'Beneficiary Satyapan App' द्वारेच सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.सर्व संबंधित लाभार्थ्यांनी वेळेत आपले डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करून योजनेचा लाभ निरंतर सुरू ठेवावा, असे आवाहन तहसीलदार दिनेश झांपले, संजय गांधी शहर विभाग, यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. लाभार्थ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून 'Beneficiary Satyapan App' डाऊनलोड करून स्वतःचे हयात प्रमाणपत्र विनामूल्य सादर करावे. ज्या लाभार्थ्यांना स्वतः ॲप हाताळणे शक्य नाही, त्यांनी जवळच्या सेतू सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रावर जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी.

# ऑलिम्पिक दिनानिमित्त क्रीडासंस्कृतीचा जागर; आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा भव्य गौरव

## ऑलिम्पिक ज्योत रॅली, योग-तायक्वांदो-मल्लखांब प्रात्यक्षिकांनी विभागीय क्रीडा संकुल दुमदुमले

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनानिमित्त विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे क्रीडा, शिस्त, मैत्री आणि निरोगी जीवनशैलीचा प्रेरणादायी संदेश देणारा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. ऑलिम्पिक ज्योत रॅली, विविध क्रीडा प्रकारांची आकर्षक प्रात्यक्षिके आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंच्या सत्कारामुळे संपूर्ण परिसर क्रीडामय वातावरणाने भारावून गेला.

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, विभागीय क्रीडा संकुल समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि विविध जिल्हा क्रीडा संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाची सुरुवात सूतगिरणी चौक येथून निघालेल्या ऑलिम्पिक ज्योत रॅलीने झाली. विभागीय क्रीडा संकुलापर्यंत काढण्यात आलेल्या या रॅलीत विविध क्रीडा संघटनांचे खेळाडू, प्रशिक्षक, पालक तसेच गीता विद्यालय आणि जय भवानी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मुख्य कार्यक्रमास डॉ. प्रविण वक्ते, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, सतीश इंगळे, डॉ. मकरंद जोशी, पंकज भारसाखळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. दिनेश वंजारे आणि प्रा. गोविंद शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी ऑलिम्पिक चळवळीचे महत्त्व, क्रीडेचे सामाजिक योगदान आणि युवकांमधील क्रीडा संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज अधोरेखित केली.





यंदाच्या ऑलिम्पिक दिनाचे “Move, Learn and Discover” हे घोषवाक्य केंद्रस्थानी ठेवत उपस्थितांनी नियमित व्यायाम, खेळ आणि निरोगी जीवनशैलीचा संकल्प केला. कार्यक्रमात योग, तायक्वांदो आणि मल्लखांब या खेळांची थरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. खेळाडूंनी दाखविलेल्या कौशल्यपूर्ण सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. यावेळी दक्षिण कोरियातील बुसान येथे झालेल्या १० व्या कोरिया ओपन एरोबिक जिम्नॅस्टिक्स स्पर्धा-२०२५ मध्ये कांस्यपदक मिळविणाऱ्या खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला. ग्रुप इव्हेंटमध्ये कांस्यपदक विजेते आर्य शहा, स्मित शहा, रामदेव बिराजदार, अद्वैत वझे आणि उदय माधेकर तसेच एरो स्टेप स्पर्धेतील रोहन पागरे, अभय उन्तवाल, संकेत चिंतलवाड, तनिष्क राजगावंकर, प्रेम बांकर, श्रीपाद हराळ, दीपक अर्जुन आणि संदेश चिंतलवाड यांचा गौरव करण्यात आला.

तसेच आंतरराष्ट्रीय पॅरा जलतरणपटू रितेश केरे, आट्यापाट्या खेळातील रोहन काळे, सागर सोनवणे व वंशिना कांबळे, तलवारबाजीतील शिवछत्रपती पुरस्कार विजेते सागर मगरे तसेच आरुष जमधाडे, समर्थ पठाडे, वैदेही लोहिया आणि कबड्डीपटू अल्केश चव्हाण यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जगताप यांनी केले. विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, प्रशिक्षक, खेळाडू, पालक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी वक्त्यांनी “खेळातून मैत्री, खेळातून शांतता आणि खेळातून मानवतेची एकता” हा ऑलिम्पिक संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.


**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १/२०२६

१/- सुरेखा रमेश बोरसे, वय ७० वर्ष, धंदा घरकाम, रा. गौदेगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- अक्षय रमेश बोरसे, वय ३० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- शुभम रमेश बोरसे, वय २८ वर्ष, धंदा शिक्षण, रा. रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

निल

प्रकरण: वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रमेश बळीराम बोरसे यांचा दि. ३०.०५.२०२६ रोजी मौजे गोंदेगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ३ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते ३ हे मयत रमेश बळीराम बोरसेयांचे वारस असुन त्यांना मयत रमेश बळीराम बोरसे यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि २०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता८/४/२०२६

आदेशावरुन,

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

# खासदार यांच्या प्रवेशामुळे शिवसेना शिंदे गटाचे परभणी जिल्हयात वाढले वर्चस्व

## परभणी जिल्हयात खासदार, आमदार, जिल्हाप्रमुख मिळून करणार जिल्हयाचा विकास

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** चार वर्षांपूर्वी राज्यात घडलेल्या राजकीय स्थित्यंतराचे सर्वदूर साद-पडसाद उमटले असतांनासुध्दा अपवाद ठरलेल्या व ठाकरे कुटूंबियांशी निष्ठा राखलेल्या परभणी जिल्ह्यात तब्बल चार वर्षानंतर आज सोमवार २२ जून रोजी खासदार संजय जाधव यांच्या रुपाने खासदार तर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणूकीतून सईद खान यांच्या रुपाने आमदार असे खासदार-आमदाराचे एकाच दिवशी राजकीयदृष्ट्या बळ पटकावून शिवसेना शिंदे गटाने या जिल्ह्यातील आपलं स्थान भक्कम केलं आहे.





राज्यपातळीवर शिवसेनेत मोठ्या प्रमाणावर बंडखोरी उसळल्यानंतर त्याचे अन्य जिल्ह्यांप्रमाणे परभणी जिल्ह्यात फारसे साद-पडसाद उमटले नाहीत. खासदार-आमदारांसह अन्य मोठ्या एकाही पुढाऱ्यासह पदाधिकाऱ्याने ठाकरे कुटूंबियांची वर्षानूवर्षापासूनची साथ सोडली नाही. त्यामुळेच या जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात शिवसेना शिंदे गट राजकीयदृष्ट्या उभा राहीला नाही. शिवसेना उबाठा गटातून व्यंकटराव शिंदे व माधवराव कदम त्या पाठोपाठ प्रविण देशमुख यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. शिंदे व कदम यांना जिल्हाप्रमुख तर देशमुख यांची महानगर शहरप्रमुख म्हणून वर्णी लागली. तर पाथरी कार्यक्षेत्रातून सईद खान यांनी शिंदे गट जॉईन करीत शिवसेना शिंदे गटाच्या अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्षपदसुध्दा पटकावले. त्यानंतर माणिक पोंढे यांनी शिंदे गट जॉईन केला. माजी खासदार सुरेश जाधव पाटील, त्या पाठोपाठ माजी आमदार हरिभाऊ लहाणे, माजी जिल्हाप्रमुख भास्कर लंगोटे वगैरे मंडळींनी 'वेट अ‍ॅन्ड वॉच' केल्यानंतर शिवसेना शिंदे गटाशी सलगी केली. परंतु, राजकीयदृष्ट्या प्रभावहीन असणाऱ्या या मंडळींद्वारे शिवसेना शिंदे गटास फारसे बळ मिळाले नाही. भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हाध्यक्ष आनंद भरोसे यांनी विधानसभा निवडणूकीत शिंदे गटात उडी मारुन शिंदे गटामार्फत परभणी विधानसभा लढवली. परंतु, ते पराभूत झाले. तर शिवसेना उबाठा गटाकडून गंगाखेड विधानसभा लढविलेल्या शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख विशाल कदम यांनी सत्तेबरोबर राहण्याकरीता शिंदे गट जवळ केला. परंतु, एका पाठोपाठ एक महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीतसुध्दा शिवसेना शिंदे गट या जिल्ह्यात फारसा जनाधार मिळवू शकला नाही. महापालिकेत एकही सदस्य निवडून आला नाही. पाथरी पालिका अपवाद अन्य पालिकातसुध्दा शिंदे गट फारसा प्रभावी राहीला नाही. सईद खान यांनी पाथरी पालिकेवर सत्ता आणली व राज्याच्या नेतृत्वाचे लक्ष वेधून घेतले. तर जिल्हा परिषद निवडणूकीत सहा सदस्यांचे संख्याबळ पटकावून शिंदे गटाने स्थानिक पातळीवरील महायुतीच्या राजकीय तडजोडीत कसबसे स्थान पटकावले.

संघटनात्मकदृष्ट्या कमकुवत व नेतृत्वहीन असणाऱ्या या जिल्ह्यात राजकीयदृष्ट्या पाळेमुळे पक्के करण्याकरीता शिंदे गटाने गेल्या दीड-दोन वर्षांपासून चाचपणी सुरु केली. तेव्हा गेल्या चार-सहा महिन्यांपासून 'शेवटच्या श्वासापर्यंत ठाकरे कुटूंबियांची साथ सोडणार नाही', अशी भिष्म प्रतिज्ञा केलेल्या खासदार जाधव यांनी राजकीय भवितव्याच्या दृष्टीकोनातून शिंदे गटाशी सलगी करण्याचा निर्णय घेतला. त्या दिशेने पाऊले टाकली. अन् गेल्या आठवड्यात ठाकरे कुटूंबियांना जय महाराष्ट्र करीत जाधव यांनी आज सोमवारी मुंबईत शिवसेना शिंदे गटात अधिकृतरीत्या प्रवेश केला. त्यांच्या रुपाने या जिल्ह्यात शिवसेना शिंदे गटास मोठे बळ मिळाले असतांना योगायोग असा स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या निवडणूकीतसुध्दा शिवसेना शिंदे गटाने मोठी राजकीय प्रतिष्ठा करीत अल्पसंख्यांक असणाऱ्या सईद खान यांना महायुतीच्या साथीने विधानपरिषदेवर पोहचवून आमदारकी पटकावली.

सोमवारी खासदार व आमदार यांच्या रुपाने शिवसेना शिंदे गटास मोठे राजकीय बळ प्राप्त झाल्याने या जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात शिंदे गट आता निश्चितपणे प्रबळ बनला आहे. या दोघा लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून भविष्यात शिंदे गट जिल्ह्यात संघटनात्मक बांधणी करीत २०२९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीवर लक्ष केंद्रीत करेल, अशी चिन्हे आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### आदित्य इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, सेलूच्या विद्यार्थ्यांची डी. फार्मसी व बी. फार्मसी परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी

**सेलू,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, घेण्यात आलेल्या उन्हाळी-२०२६ परीक्षेत आदित्य इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, सेलूच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे.

डी. फार्मसी प्रथम वर्षाच्या निकालात कु. प्रतीक्षा गजमल हिने ७०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. गोरे प्रियंका हिने ६५.१०% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. प्रणिता दोईफोडे हिने ६२.८०% गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.

डी. फार्मसी द्वितीय वर्षाच्या निकालात कु. वंदना लिपने हिने ६८.५५% गुण मिळवून प्रथम क्रमांक, कु. संध्या थोरे हिने ६७.०४% गुणांसह द्वितीय क्रमांक तर कु. आवटे श्रद्धा हिने ६६.४६% गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

याशिवाय बी. फार्मसी तृतीय वर्षातील कु. विषया ढोणे, कु. वेदिका सोळंके, कु. मंदाकिनी मुळे, कु. साक्षी कदम व कु. प्रतीक्षा तुरे यांनी उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी करून संस्थेच्या यशात भर घातली. तसेच बी. फार्मसी द्वितीय वर्षातील कु. सावनी करवा, कु. सोहा खान, कु. संध्या शेवाळे, कु. सायली जगताप, कु. वैष्णवी पवार व कु. साक्षी गायकवाड यांनीही उल्लेखनीय यश संपादन करून आपल्या गुणवत्तेची छाप पाडली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेश कोल्हे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, ''फार्मसी हे केवळ औषध निर्मिती किंवा औषध विक्रीपुरते मर्यादित क्षेत्र नसून रुग्णसेवा, संशोधन, गुणवत्ता नियंत्रण, क्लिनिकल फार्मसी आणि सार्वजनिक आरोग्य यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये फार्मासिस्ट महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. आधुनिक आरोग्य व्यवस्थेत प्रशिक्षित फार्मासिस्टची गरज दिवसेंदिवस वाढत असून विद्यार्थ्यांसाठी रोजगार व उद्योजकतेच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत.''

संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजय रोडगे , सचिव डॉ.सविता रोडगे , प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ.संजय रोडगे यांनी विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण परंपरेला अधिक बळ मिळाले असून भविष्यात सक्षम, जबाबदार व समाजाभिमुख फार्मासिस्ट घडविण्याचा संस्थेचा संकल्प असल्याचे यावेळी नमूद करण्यात आल

### आंतरराष्ट्रीय योग दिनी प्रशांत घिके यांचा विक्रम; विरासनात १ तास ५० मिनिटे स्थिर राहून नवा मानदंड

**जिंतूर,/प्रतिनिधी:** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिंतूर शहरातील योगसाधक प्रशांत घिके यांनी विरासनात तब्बल १ तास ५० मिनिटे ०४ सेकंद स्थिर राहून उल्लेखनीय कामगिरी केली. यापूर्वी असलेला १ तास ४६ मिनिटांचा विक्रम मागे टाकत त्यांनी योग क्षेत्रात नवा मानदंड प्रस्थापित केला असून जिंतूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

जिंतूर शहरात मागील पाच वर्षांपासून योगगुरू परमेश्वरजी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत योग प्रशिक्षण सुरू आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे अनेक युवक-युवतींमध्ये योगाविषयी जागरूकता




निर्माण झाली असून नियमित योगाभ्यासाची गोडी लागली आहे. या योगपरिवारातून प्रशांत घिके तसेच त्यांच्या कन्या कु. श्रेया घिके व कु. सान्वी घिके यांनी विविध योगासनांचा नियमित सराव करून राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये यश संपादन करत जिंतूरचे नाव उज्ज्वल केले आहे. शहरातील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात प्रशांत घिके यांनी विरासनाची साधना सुरू केली. संपूर्ण कालावधीत कोणतीही हालचाल न करता त्यांनी १ तास ५० मिनिटे ०४ सेकंड हे आसन कायम ठेवत उपस्थितांची दाद मिळवली. त्यांच्या या कामगिरीमुळे योग क्षेत्रातील चिकाटी, एकाग्रता आणि सातत्यपूर्ण साधनेचे महत्त्व अधोरेखित झाले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य मुटकुळे सर, योग शिक्षक परमेश्वर काकडे, योगसाधक पंडित दाभाडे, नाना काटे, संतोष कटारे, प्रा. कापरे, प्रा. मते, रामेश्वर दाभाडे, कैलास चव्हाण, विष्णू मुटकुळे, मित्र गजानन शेळके तसेच सह योग शिक्षक सचिन रायपत्रीवार यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. योग दिनानिमित्त झालेल्या या विक्रमी कामगिरीमुळे जिंतूर शहराच्या योग परंपरेला नवी ओळख मिळाली असून युवकांमध्ये योगाविषयी प्रेरणा निर्माण झाली आहे..



## आत्महत्याग्रस्त शेतकरी महिलांना बियाणे वाटप

**सोनपेठ,/प्रतिनिधी** - जागतिक एकल महिला दिनानिमित्त सोनपेठ तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी एकल महिलांना कृषी समृध्दी सहकारी संस्थेच्या वतीने पेरणीसाठी सोयाबीन व कापसाचे बियाणे देण्यात आले. सोनपेठ तालुक्यात झालेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त एकल शेतकरी महिलांना कृषी समृध्दी सहकारी संस्था सोनपेठ यांच्या वतीने सोयाबीन व कापसाचे बियाणे उपलब्ध करून देण्यात आले.

जागतिक एकल महिला दिनाच्या निमित्ताने हे बियाणे एकल महिलांना त्यांच्या घरी जाऊन देण्यात आले. वाणी संगम येथील आत्महत्याग्रस्त एकल शेतकरी महिला प्रियंका विलास काळे यांना सोनपेठ तहसीलदार सुनील कावरखे, पंचायत समितीचे उपसभापती पद्मसिंह देशमुख भारत राष्ट्र किसान समितीचे सुधीर बिंदू यांच्या उपस्थितीत बियाणे देण्यात आले. तर उक्कडगाव येथील भाग्यश्री महेश चांदवडे यांना विठ्ठल कृषी सेवा केंद्राचे आशिष विठ्ठल पुरबुज, कैलास कृषी केंद्राचे प्रणव प्रशांत पापंटवार यांच्या हस्ते बियाणे देण्यात आले.

यावेळी कृषी समृध्दी सहकारी संस्थेचे सचिव सोमनाथ नागुरे, कृषी सहायक ज्ञानेश्वर लव्हाळे, महेश घेवारे , तलाठी शाहुराव दिक्षीत ,वाणी संगमचे पोलीस पाटील शेषेराव चव्हाण, प्रताप भंडारे , रामेश्वर चांदवडे, भगवान चांदवडे, रवीराज चांदवडे यांच्या सह शेतकरी उपस्थित होते. यावेळी सोनपेठ तालुक्यातील आत्महत्या ग्रस्त एकल शेतकरी महिलांच्या शिक्षण घेणाऱ्या पाल्यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी संस्थेच्या वतीने घेण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सुधीर बिंदू यांनी दिली . या साठी कृषी समृध्दी सहकारी संस्थेशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले.

## जालना रस्त्यावर दुचाकी-अ‍ॅपे लोडिंग वाहनाची समोरासमोर धडक; एकजण गंभीर जखमी

**जिंतूर,/प्रतिनिधी** - शहरातील जालना रस्त्यावरील होंडा शोरूमसमोर रविवारी (दि. २१) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास दुचाकी व अ‍ॅपे लोडिंग वाहनाची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोघेजण जखमी झाले. यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकी जालना रस्त्याच्या दिशेने जात होती, तर अ‍ॅपे लोडिंग वाहन जिंतूर शहराकडे येत होते. होंडा शोरूमसमोर दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेनंतर दुचाकीस्वार रस्त्यावर फेकले गेल्याने ते गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते नागेश आकात व



जाधव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी रक्तबंबाळ अवस्थेतील जखमींना जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिनी श्रृंगारे यांनी प्राथमिक उपचार केले.

या अपघातात सुभाष भीमा आडे (वय ४५, रा. बेलखेडा, ता. जिंतूर) यांच्या डोक्याला व चेहऱ्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले. दुसऱ्या जखमी व्यक्तीलाही दुखापत झाली असून त्याची ओळख वृत्त लिहिपर्यंत समजू शकली नव्हती.

दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. वृत्त लिहिपर्यंत या प्रकरणाची जिंतूर पोलीस ठाण्यात नोंद झालेली नव्हती, अशी माहिती मिळाली.

### श्रुतपंचमीच्या शुभमुहूर्तावर जैन गुरुकुलाचा शुभारंभ

**परभणी,/प्रतिनिधी:** श्री १००८ नेमिनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र संचलित गुरुकुलाचा शुभारंभ शुक्रवार १९ जून रोजी श्रुतपंचमी या जैन धर्मातील पवित्र पर्वाच्या शुभमुहूर्तावर संपन्न झाला. परमपूज्य १०८ आचार्य पवित्रसागरजी महाराज तथा परमपूज्य १०८ प्रशांतसागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती होती.

## ताडबोरगाव-साळापुरी प्रमुख रस्त्यास ४२० कोटींची मंजुरी

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** पाथरी विधानसभा मतदारसंघातील महत्त्वाच्या ताडबोरगाव ते साळापुरी या प्रमुख रस्त्याच्या उभारणीसाठी ४२ किलोमीटर लांबीच्या कामाकरिता सुमारे ४२० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार राजेश विटेकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाल्याने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती मिळणार आहे.

मानवत तालुक्यातील एमएसएच-२२२ ताडबोरगाव येथून सुरू होणारा हा मार्ग देवळगाव आवचार, सावरगाव खुर्द, पाळोदी, पिंपळा, एसएच-६१, मंगरुळ, रामपुरी बुद्रुक, साळापुरी, रुमणा मार्गे राष्ट्रीय महामार्ग ७५२-के पर्यंत जोडला जाणार आहे. परभणी तालुक्यापर्यंत संपर्क वाढविणाऱ्या या रस्त्याचे काम एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक योजनेअंतर्गत हाती घेण्यात येणार आहे.

या रस्त्याच्या उभारणीची आवश्यकता आणि महत्त्व अधोरेखित करणारा सविस्तर अहवाल आमदार राजेश विटेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला होता. त्यानुसार राज्य शासनाने या प्रस्तावास मंजुरी देत २२ जून रोजी सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये या कामाचा समावेश करून निधीला अंतिम मान्यता दिली.

# यशवाडी दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करा; मराठा सेवा मंडळाची मागणी



## पिडितांना आर्थिक मदत व दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** श्रीक्षेत्र यशवाडी मंदिर संस्थान येथे सभा मंडप कोसळून झालेल्या दुर्दैवी दुर्घटनेच्या निषेधार्थ तसेच पीडितांना न्याय मिळावा या मागणीसाठी मराठा सेवा मंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षकांना निवेदन सादर करण्यात आले. दुर्घटनेची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच मृत व जखमी भाविकांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी निवेदनारे करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बांधकाम सुरू असलेल्या परिसरात भाविकांना प्रवेश कसा देण्यात आला, सुरक्षा उपाययोजना, बॅरिकेडिंग, तांत्रिक तपासणी, संरचनात्मक सुरक्षितता व देखरेख यामध्ये काही त्रुटी राहिल्या होत्या का, याची सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच मंदिर संस्थान व्यवस्थापन समितीने भाविकांच्या सुरक्षेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या होत्या, याचीही जबाबदारी निश्रि्चत करण्यात यावी.

मराठा सेवा मंडळाने संपूर्ण घटनेची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी, बांधकाम प्रक्रिया व संबंधित परवानग्यांची तपासणी, तसेच चौकशीत निष्काळजीपणा अथवा नियमभंग सिद्ध झाल्यास मंदिर व्यवस्थापन समिती, अभियंते, अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यावर कठोर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे.

याशिवाय मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २५ लाख रुपये आर्थिक मदत, गंभीर जखमींना प्रत्येकी १० लाख रुपये मदत, सर्व जखमींचा वैद्यकीय खर्च शासनाने उचलावा, धार्मिक स्थळांवरील बांधकामांचे विशेष सुरक्षा परीक्षण करावे आणि बांधकाम सुरू असताना भाविकांच्या सुरक्षेची जबाबदारी निश्चित करावी, अशा विविध मागण्याही निवेदनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी शिष्टमंडळाने यावेळी केली.

यावेळी मराठा सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नितीन देशमुख, मराठा समन्वयक बालाजी मोहिते, संभाजी सेना जिल्हाप्रमुख विठ्ठल तळेकर, जिल्हाध्यक्ष गोविंद इककर, रमेश देशमुख, अ‍ॅड. प्रीती घुले, बाळासाहेब पोळ, अ‍ॅड. ज्ञानेश्वर घुले, संदीप गव्हाणे, कुणाल गायकवाड, राहुल कांबळे, राहुल जयस्वाल, स्वप्निल गरुड, नितीन महाराज गोगलगावकर, रामा विश्वनाथ शिंदे, शंकरराव मोरे, रोहिदास नेटके, ईश्वर काळे, शिवाजीराव आढणे, गोविंद जमदाडे, सुभाषराव फुलारे, देविदास वानखेडे, दत्ता सुरजोशे, पवन करवंदे, स्वप्निल सुरजोसे, सुशील गायकवाड, दीपक बिडवे, सुबोध काळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अग्रलेख

# कर्जबुडव्यांची कारस्थाने

सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच केलेल्या एका निरीक्षणामुळे भारताच्या बँकिंग व्यवस्थेबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी वितरित केलेले हजारो कोटी रुपयांचे कर्ज अत्यल्प रकमेत 'सेटल' केले जात असल्याच्या आरोपांवर सुनावणी करताना न्यायालयाने बँका, मालमत्ता पुनर्रचना कंपन्या (असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीज-एआरसी) आणि कर्जदार यांच्यातील संगनमताबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. बँकांमार्फत दिले जाणारे कर्ज म्हणजे कोणत्याही खाजगी व्यक्तीचे पैसे नसून, ते जनतेच्या ठेवी, करदात्यांच्या पैशांवर उभ्या असलेल्या व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करतात, याकडे लक्ष वेधताना कर्ज वसुलीसाठी प्रयत्न न करणे स्वीकारार्ह नाही, असे न्यायालयाचे म्हणणे आहे. खरे तर कर्जबुडव्यांच्या कारस्थानाची ही कहाणी नवी नाही. गेली अनेक दशके, अनेक प्रकारचे कर्जबुडवे सतत बँकांना टोपी घालत आहेत आणि त्यायोगे सामान्यांना लुबाडत आहेत. गेल्या दोन दशकांत भारताच्या बँकिंग क्षेत्रात गंभीर स्वरूप धारण केलेली ही समस्या आहे. मोठ्या उद्योगसमूहांनी घेतलेली कर्जे, त्यांचे थकबाकीत रूपांतर, एआरसीमार्फत झालेले व्यवहार आणि शेवटी अत्यल्प रकमेत झालेली 'सेटलमेंट' या संपूर्ण साखळीकडे संशयाने पाहावे अशीच परिस्थिती आहे.

यापूर्वी सार्वजनिक बँकांनी केलेल्या अशा व्यवहारांचा इतिहास पाहिला तर सर्वोच्च न्यायालयासमोर आलेला विषय तसा किरकोळ म्हटला पाहिजे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे सुमारे १,५३७ कोटी रुपयांचे थकित कर्ज दोन एआरसींच्या माध्यमातून केवळ ७३.५ कोटी रुपयांत सेटल करण्यात आले, हा तो विषय. हा दावा खरा असेल तर बँकांना आपल्या देय रकमेपैकी पाच टक्क्यांपेक्षाही कमी रक्कम स्वीकारून सेटलमेंट केले असा अर्थ काढता येतो. हा फरक सामान्य नागरिकाच्या दृष्टीने समजून घेण्यासाठी एक साधे उदाहरण देता येईल. एखाद्या व्यक्तीने १० लाखांचे कर्ज घेतले आणि नंतर ते केवळ ५० हजार रुपये देऊन संपवले, तर बँकेचे किती नुकसान होईल? आणि बँकेचे नुकसान म्हणजे कुणाचे नुकसान असते? हजारो कोटी रुपयांच्या व्यवहारांमध्ये असे घडत असेल, तर त्याचे परिणाम किती गंभीर असतील याचा अंदाज बांधणे अवघड नाही. पाच हजाराची इन्स्टॉलमेंट चुकली तर बँकांकडून फोनावर फोन, मेलवर मेल येतात आणि शेकडो-हजारो कोटी रुपयांच्या थकबाकीवर अशा प्रकारे मार्ग काढले जात असतील तर सामान्यांना संताप येणारच. १९९० नंतरच्या आर्थिक सुधारणांच्या काळात बँकांच्या बुडीत कर्जांची समस्या वाढू लागली. अनेक उद्योग, पायाभूत सुविधा प्रकल्प आणि व्यावसायिक उपक्रम आर्थिक अडचणीत आले. परिणामी, बँकांच्या ताळेबंदात मोठ्या प्रमाणात एनपीए (नॉन परफॉर्मिंग असेट्स) दिसू लागले. अर्थात वसुलीत अडचण असलेल्या त्या रकमा होत्या. या समस्येवर उपाय म्हणून एआरसीची संकल्पना पुढे आली होती. एआरसीचे काम म्हणजे बँकांकडून बुडीत कर्जे विकत घेणे आणि नंतर त्यांची वसुली करणे. वरकरणी ही व्यवस्था योग्य वाटते. कारण बँकेला तत्काळ काही रक्कम मिळते आणि वसुलीची जबाबदारी एआरसीकडे जाते. त्यामुळे बँकेच्या ताळेबंदावरील ताण कमी होतो. मात्र, प्रत्यक्ष व्यवहारात ही व्यवस्था किती पारदर्शक आहे, हा प्रश्नच आहे. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली चिंता याच मुद्याभोवती फिरणारी आहे. एखादे कर्ज त्याच्या वास्तविक मूल्यापेक्षा अत्यल्प किमतीत निकाली काढले जात असेल तर त्या व्यवहाराचा फायदा नेमका कोणाला होतो, हा यातील कळीचा प्रश्न. संबंधित उद्योग खरोखरच पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या कोलमडला असेल आणि वसुलीची कोणतीही शक्यता नसेल तर कमी रक्कम स्वीकारणे एकवेळ व्यवहार्य म्हणता येईल. तसे नसेल तर मात्र काही तरी कारस्थान असणार, अशी शंका घेता येते. कर्जदार, एआरसी आणि काही बँक अधिकारी यांच्यातील संगनमतामुळे कर्जाचे मूल्य मुद्दाम कमी दाखवले गेले तर सार्वजनिक पैशाचे प्रचंड नुकसान होऊ शकते. न्यायालयाने याच संभाव्य धोक्याकडे लक्ष वेधले आहे. अनेकांना असे वाटते की बँकेचे नुकसान म्हणजे बँकेच्या व्यवस्थापनाचे नुकसान असते. परंतु सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या बाबतीत ही समजूत चुकीची आहे. सार्वजनिक बँकांमध्ये ठेवलेला पैसा हा लाखो ठेवीदारांचा असतो. याशिवाय बँकांना सरकारकडून भांडवली मदत दिली जाते. एखाद्या बँकेला मोठ्या प्रमाणावर नुकसान होते, तेव्हा सरकारला त्या बँकेचे पुनर्भांडवलीकरण करावे लागते. यासाठी वापरला जाणारा पैसा शेवटी करदात्यांचाच असतो.

भारताच्या बँकिंग व्यवस्थेवर नेहमीच एक आरोप केला जातो. तो म्हणजे छोट्या कर्जदारांवर कठोर कारवाई होते आणि मोठ्या कर्जदारांबाबत तुलनेने मवाळ भूमिका घेतली जाते. हा आरोप तथ्यहीन नाही. शेतीच्या कर्जाचा हप्ता थकवणाऱ्या शेतकऱ्याला लगेच नोटीस मिळते. घरकर्जाचा हप्ता थकल्यास मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू होते. वाहन कर्ज थकल्यास वाहन उचलले जाते. मात्र, हजारो कोटी रुपयांची कर्जे थकवणाऱ्या उद्योगसमूहांच्या बाबतीत अनेकदा दीर्घकालीन पुनर्रचना, पुनर्वित्तपुरवठा, सवलती आणि सेटलमेंटचे पर्याय उपलब्ध करून दिले जातात. बँकेच्या ग्राहकांबाबतचा हा भेदाभेद संतापजनक आहेच. गेल्या दीडेक दशकात बँकिंग क्षेत्राला मोठ्या एनपीएच्या संकटाचा सामना करावा लागला हे खरे. पायाभूत सुविधा, ऊर्जा, पोलाद, दूरसंचार आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील अनेक प्रकल्प अडचणीत आले. परिणामी, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची लाखो कोटी रुपयांची कर्जे अडकली. अनेक बँकांना मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागला. सरकारला त्यांचे हजारो कोटी रुपयांचे पुनर्भांडवलीकरण करावे लागले. त्यावरच्या उपायांचा भाग म्हणून एआरसीसारख्या यंत्रणांनी काम करावे, अशी अपेक्षा आहे. बहुतांशी होतेय ते उलटेच. एआरसी हा वित्तीय व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. परंतु, अशा महत्त्वाच्या संस्थांकडे अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व असणे आवश्यक असते. थकित कर्जाचे मूल्यांकन कसे होते? ते कोणत्या किमतीत विकले जाते? खरेदीदार कोण आहे? नंतरची सेटलमेंट कोणत्या अटींवर केली जाते? आणि संबंधित कर्जदाराशी कुणाचे अप्रत्यक्ष संबंध आहेत का? या सर्व बाबींची तपासणी आवश्यक ठरते. ती होत असेल तरी त्यात पारदर्शिता नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निरीक्षणाचे महत्त्व असे की, भारतातील बँकिंग व्यवस्थेतील सर्वांत मोठ्या नैतिक आणि आर्थिक प्रश्नांपैकी एकावर त्याने बोट ठेवले आहे. कर्जबुडवे, बँका आणि मालमत्ता पुनर्रचना कंपन्या यांच्यातील संबंध पारदर्शक, निष्पक्ष आणि सार्वजनिक हिताला पूरक असणे आवश्यक आहे. अन्यथा जनतेचा पैसा काही मोजक्या लोकांच्या फायद्यासाठी वापरला जात असल्याची भावना अधिक बळावेल, असा या निरीक्षणाचा अर्थ आहे. लोकशाही व्यवस्थेत करदात्यांचा पैसा हे सार्वजनिक वित्त व्यवस्थेवरील विश्वासाचे प्रतीक मानले जाते. ही व्यवस्था आपल्या कल्याणासाठी काम करते या विश्वासापोटी ठेवी दिल्या जातात. त्या विश्वासाचे संरक्षण करणे ही केवळ बँकांची किंवा सरकारचीच नव्हे, तर न्यायव्यवस्थेचीही जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या हस्तक्षेपामुळे या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे दिसते. पण, हा विषय सतत पुढे जात राहिला पाहिजे. इतिहासातही जी मोठी कर्जे 'सेटल' झालेली आहेत, त्यांची तपासणी झाली पाहिजे. जे लोक बँकांना आणि पर्यायाने सामान्यांना लुबाडत आहेत, त्यांना देशाचे शत्रू म्हणून वागवायचे की त्यांचा पाहुणचार करायचा, यावर धोरणात्मक निर्णय बँकिंग क्षेत्राला घ्यावा लागेल. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एक दिशा दिली आहे. आता कर्जबुडव्यांच्या कारस्थानांच्या कहाण्या उघडकीस आणण्याची जबाबदारी सरकारची आहे. ■

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# भारताच्या युरोप धोरणाला नवी ताकद

भारताचे परराष्ट्र धोरण गेल्या दशकात केवळ सीमांचे संरक्षण किंवा पारंपरिक मैत्री जपण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. आज भारत जगभरात आर्थिक, तांत्रिक, सामरिक आणि राजनैतिक हितसंबंधांचे विस्तृत जाळे उभारत आहे. 'बहुआयामी परराष्ट्र धोरण' ही भारताची नवी ओळख बनली आहे. अमेरिका, रशिया, फ्रान्स, जपान, ऑस्ट्रेलिया, आखाती देश आणि आफ्रिकी राष्ट्रांबरोबरच आता युरोपमधील लहान पण धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या देशांशीही भारत संबंध दृढ करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्लोव्हाकिया दौऱ्याने याच नव्या धोरणाला अधिक स्पष्ट दिशा दिली आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच एखाद्या भारतीय पंतप्रधानाने स्लोव्हाकियाला भेट दिली आणि दोन्ही देशांनी आपल्या संबंधांना 'व्यापक भागीदारी' (कॉंप्रिहेन्सिव्ह पार्टनरशिप) या स्तरावर नेण्याचा निर्णय घेतला. या दौऱ्यात संरक्षण, ऊर्जा, डिजिटल तंत्रज्ञान, उच्च शिक्षण, क्वांटम कम्युनिकेशन, स्थलांतर, उद्योग आणि व्यापार अशा विविध क्षेत्रांमध्ये तब्बल अकरा करार झाले. वरकरणी हा द्विपक्षीय दौरा वाटत असला, तरी त्यामागे भारताच्या बदलत्या जागतिक रणनीतीचा व्यापक संदेश दडलेला आहे. आजचे जागतिक राजकारण शीतयुद्धाच्या काळापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. अमेरिका-चीन संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील अस्थिरता, पुरवठा साखळीतील बदल, ऊर्जासंकट आणि तांत्रिक स्पर्धा यामुळे जगात नवी शक्तिसमीकरणे तयार होत आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येक देश विश्वासार्ह भागीदारांचा शोध घेत आहे. भारतासाठीही ही एक मोठी संधी आहे.

जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, प्रचंड बाजारपेठ, कुशल मनुष्यबळ आणि स्थिर लोकशाही यामुळे भारताचे महत्त्व झपाट्याने वाढत आहे. स्लोव्हाकिया हा आकाराने लहान देश असला, तरी युरोपीय महासंघ आणि 'नाटो'चा महत्त्वाचा सदस्य आहे. ऑटोमोबाईल उद्योग, संरक्षण उत्पादन, यांत्रिक अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स आणि अत्याधुनिक उत्पादन तंत्रज्ञानात त्याने मोठी प्रगती केली आहे. युरोपमधील अनेक नामांकित वाहन उत्पादकांचे उत्पादन केंद्र स्लोव्हाकियात आहे. त्यामुळे भारतासाठी हा देश केवळ व्यापार भागीदार नसून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्रोत ठरू शकतो. भारताने गेल्या काही वर्षांमध्ये 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना मोठ्या प्रमाणावर चालना दिली आहे. संरक्षण, इलेक्ट्रॉनिक्स, रेल्वे, हरित ऊर्जा आणि सेमीकंडक्टर उत्पादनात स्वदेशी क्षमता वाढवण्यावर भर दिला जात आहे; मात्र स्वावलंबन म्हणजे जगापासून दूर जाणे नव्हे, तर जागतिक भागीदारीच्या



माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे होय. स्लोव्हाकियाबरोबरचे करार याच उद्दिष्टाला पूरक ठरणारे आहेत. विशेषतः संरक्षण सहकार्याचा विचार केला, तर त्याचे दूरगामी परिणाम दिसू शकतात. भारत आज जगातील सर्वांत मोठ्या संरक्षण आयातदारांपैकी एक असला, तरी त्याचबरोबर स्वदेशी संरक्षण उत्पादन वाढवण्याचा प्रयत्नही करत आहे. स्लोव्हाकियाकडे संरक्षणक्षेत्रातील प्रगत अभियांत्रिकी, लष्करी वाहने, तोफखाना आणि विशेष उपकरणांच्या निर्मितीचा अनुभव आहे.

स्लोव्हाकियाबरोबरील ऊर्जासुरक्षेच्या क्षेत्रातील सहकार्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. वाढत्या अर्थव्यवस्थेमुळे भारताची ऊर्जेची गरज सातत्याने वाढत आहे. कोळसा आणि तेलावरचे अवलंबित्व कमी करून अणुऊर्जा, हरित ऊर्जा आणि स्वच्छ तंत्रज्ञानाकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे. स्लोव्हाकियाला अणुऊर्जेचा मोठा अनुभव आहे. त्यामुळे या क्षेत्रातील सहकार्य भारतासाठी उपयुक्त ठरू शकते. ऊर्जा सुरक्षेबरोबरच ऊर्जा संक्रमणाचा मार्गही यामुळे अधिक सुलभ होईल. या दौऱ्यात भारत-युरोपीय महासंघ मुक्त व्यापार कराराला (एफटीए) गती देण्याबाबत दोन्ही देशांनी सकारात्मक भूमिका घेतली. हा करार निश्चित झाल्यास भारतीय उद्योगांसाठी युरोपमधील सुमारे ४५ कोटी ग्राहकांची बाजारपेठ अधिक खुली होईल. माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती, वस्त्रोद्योग, कृषी प्रक्रिया, अभियांत्रिकी आणि स्टार्टअप क्षेत्रांना त्याचा मोठा फायदा होऊ शकतो. दुसरीकडे, युरोपियन गुंतवणूक भारतात वाढण्याची शक्यताही निर्माण होईल. भारताच्या निर्यातीसाठी युरोपीय बाजारपेठ अत्यंत महत्त्वाची आहे. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी युरोपीय उद्योग भारताकडे पर्यायी उत्पादन केंद्र म्हणून पाहत आहेत. भारताने ही संधी ओळखून पायाभूत सुविधा, उत्पादनक्षमता आणि धोरणात्मक स्थिरतेवर भर दिला पाहिजे. भारतीय उद्योग जागतिक स्पर्धेला समर्थपणे सामोरे जातील तेव्हाच मुक्त व्यापार कराराचा लाभ मिळेल. या दौऱ्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे कुशल मनुष्यबळाची देवाणघेवाण.

आज युरोपमधील अनेक देश वृद्धत्वाकडे झुकणाऱ्या लोकसंख्येमुळे कुशल कामगारांच्या कमतरतेचा सामना करत आहेत. भारताकडे मात्र मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षित तरुण मनुष्यबळ उपलब्ध आहे. दोन्ही देशांमधील श्रम स्थलांतर करारामुळे भारतीय अभियंते, डॉक्टर, संशोधक, आयटी व्यावसायिक आणि तंत्रज्ञांना नवीन संधी उपलब्ध होऊ शकतात. त्याचबरोबर सामाजिक सुरक्षा करारामुळे परदेशात काम करणाऱ्या भारतीयांच्या हितांचेही संरक्षण होईल. भविष्यात चलतीत राहू शकणाऱ्या डिजिटल तंत्रज्ञान आणि 'क्वांटम कम्युनिकेशन' या क्षेत्रांमधील सहकार्याचे महत्त्वही कमी नाही. दोन देशांमध्ये अनेकदा मोठमोठे करार होतात; पण त्यांची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे भारत आणि स्लोव्हाकिया यांनी केलेल्या करारांचे प्रत्यक्ष परिणाम दिसणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. संयुक्त उद्योग, वाढता व्यापार, संशोधन प्रकल्प, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि विद्यार्थी देवाणघेवाण या क्षेत्रांमध्ये ठोस प्रगती झाली, तरच या भागीदारीचे खरे मूल्य सिद्ध होईल. भारतीय उद्योगांनीही या नव्या संधींचा लाभ घेण्यासाठी सज्ज राहणे आवश्यक आहे. ऑटोमोबाईल, संरक्षण, रेल्वे, माहिती तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, औषधनिर्मिती आणि यंत्रनिर्मिती क्षेत्रातील कंपन्यांनी स्लोव्हाकियासोबत संयुक्त गुंतवणुकीचा विचार केला पाहिजे. सरकारनेही उद्योगांना आवश्यक धोरणात्मक पाठबळ देणे गरजेचे आहे. आजच्या बहुध्रुवीय जगात भारताचे यश केवळ महासत्तांशी असलेल्या संबंधांवर अवलंबून नाही. लहान; पण तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या प्रभावी देशांशी मजबूत भागीदारी उभारणे ही काळाची गरज आहे. स्लोव्हाकियासोबतचा करार हा त्याच दूरदृष्टीचा भाग आहे. या दौऱ्याचे महत्त्व केवळ अकरा करारांमध्ये किंवा संयुक्त निवेदनांमध्ये नाही, तर भारताच्या बदलत्या परराष्ट्र धोरणात, युरोपशी वाढत्या आर्थिक संबंधांमध्ये आणि भविष्यातील तांत्रिक सहकार्यात आहे. बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताला विश्वासार्ह आणि प्रभावी शक्ती म्हणून स्थापित करण्याच्या दिशेने हा दौरा निश्चितच एक महत्त्वपूर्ण टप्पा मानावा लागेल. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# दुःखातून आनंद शोधण्याचा प्रयत्न

मनुष्याच्या जगण्यासाठी आधुनिकता ही काळाची गरज असली तरी मनाला भरकटवणारी ही आधुनिकता जगण्याला असह्य करीत आहे. त्यामुळे जन्म आणि मृत्यू या दोघांमधील अंतर पार करताना प्रत्येक जण तारेवरची कसरत करीत असतो. माणसाचे आयुष्य हे सुख-दुःख, यश-अपयश, आशा-निराशा, येणारी अनेक संकटे आणि अनेक समस्यांनी वेढलेले असते. आपल्या जीवनामधील प्रतिकूलतेवर, संकटावर आणि समोर आ वासून उभ्या असलेल्या बिकट परिस्थितीवर मात करून रोजच्या जगण्यामध्ये आनंद फुलविणे हाच जीवन जगण्याचा खरा आनंद आहे. माणूस जोपर्यंत ही कला आत्मसात करीत नाही, तोपर्यंत त्याची फरफट निश्चित असते. जीवनामध्ये प्रत्येकाच्या वाट्याला केवळ सुख येईल असेही नाही. त्यामुळे सहजासहजी सुखावह आणि आनंदी जीवन जगणे कोणालाच शक्य नसले, तरी दुःखामधून आनंद शोधण्याचा प्रयत्न व त्या दुःखाची कारणे शोधण्याचा प्रयत्न केल्यास ती वाट सहज सुलभ करता येऊ शकते. आधुनिकता कितपत आत्मसात करावी हा ज्याचा त्याचा प्रश्न असला तरी ती आपल्या जीवनामध्ये अडसर ठरणार नाही, याचे भान ठेवणेही तेवढेच गरजेचे आहे. आजकाल प्रत्येक जण आपल्यावर असलेल्या जबाबदारीच्या ओझ्याखाली दबून पायाला चाके लागल्यागत धावपळ करीत असतो. कोणालाच कोणासाठी वेळ नाही. नात्यानात्यांमधील हरविलेली माणुसकी आणि आपुलकी सर्वाधिक दुःखाचे कारण आहे. एकटेपणा हा माणसाचा क्रमांक एकचा शत्रू असून, त्यामुळे माणूस नैराश्याच्या खाईमध्ये लोटला जात आहे. जीवनामध्ये आम्ही आमच्या संस्कृतीशी फारकत घेऊन आधुनिकतेचा मार्ग स्वीकारल्यास आमच्या पदरामध्ये काय पडेल याचा विचार आम्ही ना कधी केला आहे, ना करीत आहोत. जो वारसा घेऊन आम्ही पुढे जात आहोत, त्यामुळे येणाऱ्या भावी पिढीवर त्याचा काय परिणाम होऊ शकतो याचे चिंतनही आम्ही कधी केले नाही. देशामध्ये एकत्रित कुटुंब पद्धतीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत असल्याने त्यापासून मिळणाऱ्या आनंदाला आम्हीच येणाऱ्या भावी पिढीला वंचित ठेवले आहे.

चंचल मनाला भौतिक सुखाच्या नादी लावून मनुष्य स्वतः दुःखाला आमंत्रित करीत असतो. क्षणिक सुख हे भविष्यामध्ये अफाट दुःखाचे कारण ठरू शकते, हे माहीत असूनही आमचा मोह आवरता आवरत नाही. क्षणिक सुख हे मृगजळासारखे असते, हे माहीत असूनही त्यामागे धावून अखेर आयुष्याची राखरांगोळी होतेच. आनंदी जीवन जगण्याचा अर्थ असाही नाही की, जीवनामधील सर्व समस्या आणि संकटे आपोआप नाहीसे होतील. येणाऱ्या प्रत्येक काटेरी मार्गावर, प्रत्येक आव्हानांना न भिता सामोरे गेल्यास जीवनामध्ये येणारे प्रत्येक चढउतार स्वतःच्या मनाला स्वीकारणे सहज शक्य होऊ शकते. सदैव आनंदी राहण्यासाठी नेहमी सकारात्मक विचारांना थारा दिल्यास तेवढीच नकारात्मकता कमी होण्यास मदत होऊ शकते. नकारात्मकतेचा मनावर आणि शरीरावर गंभीर परिणाम होतो. जगामधील कोणतीच व्यक्ती परिपूर्ण नाही आणि असे होणे कदापिही शक्य नाही. त्यामुळे जे काही आहे, ते सांभाळून पुढे वाटचाल सुरू ठेवली तर जीवन जगणे सुकर होऊ शकते. त्यासाठी स्वतःमधील उणिवा ओळखून होत असलेल्या चुकांना सुधारण्याचा प्रयत्न करायला हवा. प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीतरी गुण-दोष असतातच. त्या दोषांची उजळणी करून ते आपल्या आयुष्यामधून हद्दपार केल्यास तीच व्यक्ती स्वतःला सांभाळून यशाचे शिखर गाठू शकते आणि जीवनात खऱ्या आनंदाची अनुभूती होते. 'आनंद' हा बाजारामध्ये सहज कधीच मिळणार नाही. तो मनाला प्रसन्न करणारी एक आल्हाददायक अनुभूती आहे. ही अनुभूती जीवनामध्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. त्यासाठी सदैव सकारात्मक बाबींना जवळ करून दुसऱ्यालाही आनंद देण्यास शिकले पाहिजे. लोकांना त्यांचे जीवन आनंदाच्या रंगांनी भरण्यास मदत केली पाहिजे. त्यामुळे आपणास परमोच्च आनंदाची अनुभूती होऊ शकते. आपण जे काही दुसऱ्यास देतो, त्याच्या कितीतरी पट परतावा मिळतो, हा ईश्वराचा अलिखित नियम आहे. त्यासाठी पदरचे पैसे खर्च करण्याचीही गरज नाही. आपल्या आयुष्यात दुःख आणि संकटे कधीच येऊ नये, अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. हा मुळात मानवी स्वभाव आहे. त्यासाठी तो आयुष्यभर धडपड करीत असतो. मात्र, ही धडपड चुकली की, आयुष्यामध्ये सर्वकाही चुकते. ■

९८८१७१७८५६

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# 'आयटी' कंपन्यांमधील अशीही सुलतानी!..

पुण्यातील हिंजवडी हा भाग संगणक तंत्रज्ञान म्हणजेच, 'आयटी' क्षेत्रातील उद्योगविश्वासाठी प्रसिद्ध असाच. अनेक प्रतिष्ठित व प्रस्थापित उद्योग-व्यवसाय येथे आहेत. 'आयटी' क्षेत्रासाठी प्रसिद्ध असणाऱ्या या भागातील 'थिंक टँक इंडिया प्रा. लिमिटेड' या कंपनीने, अचानकपणे व कुणालाही कसलीही पूर्वसूचना न देता आपले व्यावसायिक कामकाज बंद केले. असे केल्याने कंपनीच्या सुमारे ५०० अभियंता आणि इतर कर्मचाऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. याआधी, असे प्रकार, उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांमध्ये घडल्याचे ऐकू येत असे. यात अनेक लहान वा मध्यम आकाराच्या उद्योगांमधील, १००-२०० कामगारांना बेरोजगारीला सामोरे जाण्याचे प्रसंग बरेचदा घडले आहेत. यावर परिस्थितीनुसार व आपापल्या परीने आंदोलन किंवा संघर्षापासून अगदी बदली-स्थलांतर अथवा कायमस्वरूपी कारखाना बंद करण्यासारखे तोडगे स्वीकारले गेल्याचा इतिहास आहे.मात्र, पुण्यातील अशा प्रकारचा प्रकार म्हणजे 'आयटी'तील आक्रीतच ठरले आहे. मुख्य म्हणजे 'थिंक टँक इंडिया' या कंपनीने, कुणाचाही विचार न करता, कायद्याचाही मुलाहिजा न बाळगता हा निर्णय घेतला. कंपनीच्या या आक्रस्ताळेपणाला वाचा फुटली ती 'थिंक टँक इंडिया'मध्ये काम करणाऱ्या, एका शिकाऊ उमेदवाराने केलेल्या तक्रारीमुळे! कंपनीच्या या निर्णयामुळे इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच त्यांची नोकरी जाऊन अचानकपणे बेकारीचा सामना करावा लागणे, हा स्पष्टपणे कर्मचाऱ्यांच्या फसवणुकीचा प्रकार असल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. कर्मचारी आणि कंपनी वा व्यवस्थापनाबाबतच्या तक्रारी, सामान्यपणे कामगार कार्यालय अथवा कामगार वा औद्योगिक न्यायालयात दाखल केल्या जातात. मात्र, 'थिंक टँक' विरोधातील तक्रार हिंजवडी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली, हे विशेष. शिकाऊ उमेदवाराच्या तक्रार व तपशिलाच्या आधारे, पोलिसांनी कंपनीच्या विरोधात गुन्हा दाखल केला. यामध्ये कंपनीने कर्मचाऱ्यांचे वेतन न देणे, अचानक व्यवसाय बंद करून कर्मचाऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी, कायद्याच्या 'कलम ३१६' नुसार विश्वासघात करणे व 'कलम ३१८' म्हणजेच फसवणूक करणे या कलमांतर्गत फौजदारी तक्रार दाखल केली, हेदेखील यासंदर्भात महत्त्वाचे आहे.

या प्रकरणी हिंजवडी पोलिसांनी 'थिंक टँक कंपनी'चे मुख्याधिकारी, प्रशिक्षण व्यवस्थापक व 'एचआर' व्यवस्थापकांच्या विरोधात तक्रार दाखल करून, गुन्हाही नोंदवला आहे. त्यानंतर पोलिसांनी याबाबत प्राथमिक चौकशी करून, कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हर्षल ठाकरे यांना नाशिक येथे अटकही केली. पुढे त्यांना पुढील चौकशी व कारवाईसाठी पुण्याला आणण्यात आले.

'थिंक टँक'च्या कर्मचाऱ्यांनुसार, कंपनी प्रामुख्याने संगणक क्षेत्रांतर्गत इतर मोठ्या व्यावसायिक कंपन्यांसाठी 'ॲप'ची निर्मिती करण्याचे काम प्रामुख्याने करीत असे. यासाठी आवश्यक अशा संगणकतज्ज्ञ व इंजिनीअर्सची निवड, प्रामुख्याने छोट्या शहरातून होई. अशा प्रकारे निवड झालेल्या उमेदवारांना ॲपवर आधारित कामकाज व वेब सर्व्हिसचे प्रशिक्षण देऊन, त्यांच्यामार्फतच कंपनीचे कामकाज चालवले जात असे. कंपनीच्या धोरणानुसार, 'थिंक टँक'मध्ये नेमणूक करताना कंपनीच्या निर्णयानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याकडून लॅपटॉपसाठी १५ हजार रु. घेण्यात आले होते. शिवाय कर्मचाऱ्यांच्या तक्रारीनुसार, त्यांना गेले दोन महिने पगारही देण्यात आला नव्हता. अशा प्रकारे कंपनीने कर्मचाऱ्यांची दिशाभूल व आर्थिक फसवणूक केल्याचा व त्याद्वारे लाखो रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप, कंपनीच्या कर्मचाऱ्यांतर्फे करण्यात येत आहे.

या प्रकरणातील उपलब्ध तपशिलानुसार, कंपनीने गेल्यावर्षी इंजिनीअर्स आणि विविध विभागातील कर्मचाऱ्यांची मोठी भरती केली होती. त्यासाठी प्रामुख्याने लहान शहरातील उमेदवारांची निवड करण्याला प्राधान्य देण्यात आले होते. या नव्याने उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना दरमहा १५ हजार रु. वेतन देण्याचेही कंपनीने मान्य केले होते. कंपनीच्या या योजनेला निमशहरी भागातील विद्यार्थी-उमेदवारांकडून चांगलाच प्रतिसाद मिळाला. कंपनीच्या नियमानुसार, नव्याने रुजू होणाऱ्या प्रत्येक उमेदवाराकडून १५ हजार रु. लॅपटॉपसाठी घेऊन, त्यांना कामावर रुजू करून घेण्यात आले.

सुरुवातीला कंपनीमध्ये सर्वकाही सुरळीत सुरू होते. मात्र, फेब्रुवारी २०२६ पासून कर्मचाऱ्यांना विविध अडचणी येऊ लागल्या. त्यांचे पगारही पूर्वीप्रमाणे म्हणजे, महिन्याच्या ७ अथवा ८ तारखेला झाले नाहीत. यावेळी कंपनीच्या व्यवस्थापनाने जुजबी आश्वासने तर दिली. मात्र, कर्मचाऱ्यांचे पगार काही दिले नाहीत. तशातच कंपनीने आता तिचा व्यवसाय बंद केल्याने, या कर्मचाऱ्यांना पगार न मिळणे व कामबंदमुळे होणारी बेकारी अशा दुहेरी संकटांना सामोरे जावे लागत आहे. काही कर्मचाऱ्यांकडून लॅपटॉपसाठी १५ हजार रु. घेऊनही, त्यांना लॅपटॉप न मिळाल्याने तीही फसवणूक झाल्याचे कर्मचाऱ्यांचे गाऱ्हाणे रास्त आहे.

कंपनीतील कर्मचाऱ्यांची फसवणूक होण्याचे 'थिंक टँक' हे एकमेव उदाहरण नाही. 'आयटी' क्षेत्रातील कर्मचाऱ्यांमध्ये काम करणाऱ्या संघटनेच्या अहवालानुसार, सध्या संगणक क्षेत्रात नव्याने दाखल झालेल्या सुमारे चार हजार नव्या तंत्रज्ञांना नोकरीवरून कमी करण्यात आले आहे. अथवा काहींवर टांगती तलवार आहे. याशिवाय, काही 'आयटी' कंपन्यांनी नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-उमेदवारांना दिलेली, शिकाऊ-प्रशिक्षणार्थींची नेमणूकपत्रे राजरोसपणे रद्द केली आहेत.

आज मुळातच आधीच्या तुलनेत संगणकशास्त्र, 'आयटी' क्षेत्रातील नवागतांना रोजगार मिळण्याच्या संधी कमी झाल्या आहेत. 'ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट आफिसर्स फेडरेशन'चे अध्यक्ष सतीश बोंडे यांच्यानुसार, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात संगणक क्षेत्रात नव्याने उत्तीर्ण झालेल्या केवळ ४० टक्के विद्यार्थ्यांनाच रोजगार मिळाले. त्यातही आता त्यांना नोकरी रोजगार जाण्याची भीतीही भेडसावत आहे. आज असे प्रकार बरेच ठिकाणी होत आहेत. 'थिंक टँक' प्रकरण पुण्याजवळ व हिंजवडीत घडल्याने गाजत आहे, इतरांचे काय? ■

(लेखक 'एचआर' - व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### बांगलादेशात कट्टरवाद्यांचा धुडगूस

सोमवार २२ जूनच्या अंकात, उपरोक्त मथळ्याखालील बातमी वाचण्यात आली. बांगलादेशाची राजधानी ढाका येथे कट्टरवादी जमाते-ए- इस्लामी संघटनेच्या नेतृत्वात आंदोलनकर्त्यांनी; पश्चिम बंगालमध्ये बांगलादेशातून आलेल्या घुसखोरांना सीमापार परत पाठविण्याची जी कडक कारवाई भारत सरकारकडून राबविली जात आहे, त्या विरुद्ध या कट्टरवाद्यांचे आंदोलन सुरू असून त्यांनी ढाका येथील भारतीय उच्चायुक्तालयावर हल्ला करण्याचा देखील प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते भारत-बांगलादेश सीमेवरील कथित घुसखोरी आणि गोळीबाराच्या घटनांच्या निषेधार्थ हे आंदोलन त्यांनी सुरू केले आहे. जमाते इस्लामीने ही नवीन मोहीम सुरू केली असून त्यांनी भारताविरोधात नागरिकांना भडकविण्याचे काम सुरू केले आहे. अशावेळी भारत सरकारने, भारतातील बांगलादेश आयुक्तालयात कट्टर पंथीयांनी भाराताविरुद्ध सुरू केलेल्या या धुडगूसाविरुद्ध कडक शब्दात निषेध नोंदवून बांगलादेश सरकारने असल्या भारत सरकारविरुद्ध नागरिकांना भडकविण्याच्या प्रकाराला वेळीच पायबंद घालावा; अन्यथा नुकत्याच भारत व बांगलादेश दरम्यान सुरू झालेल्या सलोख्याच्या संबंधावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो, याची जाणीव करून द्यावी. कारण असल्या आंदोलकांना वेळीच आवर न घातला गेल्यास त्याचे लोण भारतात व पश्चिम बंगालमध्ये देखील पोहोचण्यास वेळ लागणार नाही. जमात-ए- इस्लामी समान शेकड्यात मोजाव्या लागतील अशा कट्टर धार्मिक संघटना साऱ्या जगात दहशतवादाने धुडगूस घालत आहेत. अशा संघटनांना वेळीच ठेचणे आवश्यक आहे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/पुणे, ७०५८९७५३७६

■■■

### डेटा सेंटर्सचे जाळे : विकास की पर्यावरणाचा ऱ्हास?

आजच्या डिजिटल युगात 'डेटा सेंटर्स' हे तंत्रज्ञानाचे केंद्रस्थान बनले आहेत. इंटरनेट, क्लाऊड स्टोरेज आणि एआयच्या वापरामुळे या केंद्रांची मागणी प्रचंड वाढली आहे. मुंबई, विशाखापट्टणमसारख्या शहरांत ही केंद्रे उभी राहत आहेत. मात्र, विकासाच्या या शर्यतीत आपण निसर्ग आणि सर्वसामान्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष तर करत नाही ना, हा प्रश्न आता गंभीर झाला आहे. डेटा सेंटर्सना २४ तास थंडावा देण्यासाठी लाखो लिटर पाण्याची गरज असते. भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि पाणी हे शेतीसाठी जीवनावश्यक आहे. जेव्हा एखादे मोठे डेटा सेंटर एखाद्या शेतीप्रधान पट्ट्यात उभे राहते, तेव्हा तिथे असलेल्या भूगर्भातील पाण्याचे साठे मोठ्या प्रमाणात उपसले जातात. ज्या पाण्यावर शेतकऱ्याचे पीक डोलले पाहिजे, ते पाणी सर्व्हर थंड करण्यासाठी वापरले जाणे हे सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या किती योग्य आहे? सरकार अनेकदा या मोठ्या टेक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी विजेचे दर कमी करणे किंवा कर सवलती देणे असे निर्णय घेते. हे जरी देशाच्या डिजिटल प्रगतीसाठी आवश्यक वाटत असले, तरी त्यामागे लागणारा खर्च आणि संसाधने ही सर्वसामान्यांच्या करातूनच उभी राहिलेली असतात. मोठ्या कंपन्यांना मिळणाऱ्या अखंडित वीजपुरवठ्यामुळे स्थानिक वीज वितरण व्यवस्थेवर ताण येतो, ज्याचा फटका शेवटी ग्रामीण भागाला आणि सामान्य नागरिकांनाच बसतो. या डेटा सेंटरसाठी पाश्चात्त्य देशांमध्ये लोक रस्त्यावर उतरून त्याचा विरोध करत आहे. आधीच अल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी पडणार. त्यामुळे सध्याच पाण्याचे दुर्भिक्ष आहे. ग्रामीण भागात तर कितीतरी पायपीट करून पिण्याचे पाणी आणावे लागते. अशा परिस्थितीत हे डेटा सेंटर इथे उभारले तर लाखो लिटर पाणी त्यांना लागणार. म्हणजे त्यानंतर किती भयानक परिस्थिती निर्माण होईल याची कल्पना न केलेली बरी.

**वर्षा आवदे**/नागपूर

■■■

### जीवनात समाधान असेल तरच पैशाचे सुख

सुख, दुःख व्यक्ती जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. व्यक्ती सुख पटकन ग्रहण करतो, पण दुःख चघळत बसतो. आज व्यक्ती पैशाच्या मागे धावत आहे. व्यक्ती पैशातच सुख, समाधान व शांती शोधत आहे. मात्र पैशाची शांती, पैशाचे समाधान हे काही काळासाठी असते. ते कायमस्वरूपी कधीच नसते, हे आज पैशामागे धावणारे विसरत आहेत. पैसा म्हणजे सर्वस्व नाही. मनाची स्थिरता, समाधान, शांती जर नसेल तर कितीही पैसा असला तरी तो समाधान देऊ शकत नाही. मनाचे समाधान व शांतीसाठी पैसा गरजेचा नाही तर आहे त्यात समाधान मानून जीवन जगणे तसेच, सामाजिक, नैतिक, मानवी, धार्मिक, कौटुंबिक कर्तव्ये मनापासून मनांनपर्यंत जपली जाणे, सामाजिक बांधिलकी जपली जाणे, जीवनात नैतिकता पाळणे व सामाजिक कर्तव्ये निःस्वार्थीपणे पार पाडणे यात खरे समाधान आहे. असे समाधान असेल तर पैसा सुख देतो, नाहीतर कितीही पैसा कमविला तरी कमीच पडतो. म्हणून म्हटले आहे की, 'ठेविले अनंते, तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधानी.' सुख, शांती, समाधान तेव्हाच मिळते जेव्हा चित्त शांत व निरोगी, निर्विकारी असते. अशा जीवनात सुख आपोआपच येते. पैशाने असे सुख येत नाही. पैशाने येणारे सुख हे क्षणिक असते, हे विसरून चालणार नाही. ■

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त...

### 'जागतिक योग दिन' उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

उदगीर दि २३ जून : शरीर, मन आणि बुद्धी यांचा समतोल साधणारी योगविद्या ही भारतीय संस्कृतीची जगाला लाभलेली अमूल्य देणगी आहे. या योगविद्येचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात 'जागतिक योग दिन' अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक वसंत वाघमारे तर प्रमुख पाहुणे स्वदेश योग अँड वेलनेस सेंटर उदगीरचे योगप्रशिक्षक डॉ. सुरेश गरड उपस्थित होते. यावेळी पर्यवेक्षक किरण नेमट माधव मठवाले क्रीडा शिक्षक संतोष कोल्हे संदीप जाधव तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी योगाभ्यासात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

प्रमुख पाहुणे डॉ. सुरेश गरड यांनी योगाचे शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक लाभ स्पष्ट करताना नियमित योगाभ्यासामुळे तणावमुक्त, निरोगी आणि सकारात्मक जीवन जगता येते, असे प्रतिपादन केले. त्यांनी विविध योगासने, प्राणायाम व ध्यानधारणेची प्रात्यक्षिके सादर करून विद्यार्थ्यांना त्यांचे महत्त्व समजावून सांगितले. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि योग यांचा समन्वय साधल्यास आरोग्यसंपन्न जीवनाची वाट सुकर होते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत संदीप जाधव यांनी केले. सूत्रसंचालन आभार संतोष कोल्हे यांनी केले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## हजारो स्वप्नांची निर्णायक परीक्षा शांततेत पार

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २३ जून : देशातील वैद्यकीय शिक्षणाचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET) रविवारी उदगीर शहरात अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात आणि कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत पार पडली. लाल बहादूर शास्त्री विद्यालय आणि छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय या दोन केंद्रांवर विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा महत्त्वपूर्ण निर्णय ठरणारी व वैदयकीय क्षेत्रात प्रवेशाचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट) रविवारी उदगीर शहरात कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत आणि अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

लाल बहादूर शास्त्री विद्यालय आणि छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय या (UDGIR NEET EXAM) दोन परीक्षा केंद्रांवर प्रशासनाने अक्षरशः 'हाय अलर्ट' जारी केल्याचे चित्र पाहायला मिळाले.नीट परीक्षेच्या पार्श्र्वभूमीवर सकाळपासूनच पोलीस प्रशासनाने परीक्षा केंद्र परिसर ताब्यात घेतला होता. केंद्राकडे जाणारे सर्व मार्ग नियंत्रित करण्यात आले होते. केवळ परीक्षार्थींनाच प्रवेश देण्यात येत असल्याने परिसरात अनावश्यक गर्दीला आळा बसला. प्रत्येक हालचालीवर पोलिसांचे बारकाईने लक्ष होते. परीक्षेच्या पारदर्शकतेला बाधा पोहोचू नये आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी केंद्रांवर विशेष सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच विद्यार्थी केंद्रांवर दाखल झाल्याने परिसरात उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले होते.

सुरक्षेबरोबरच आरोग्य विभागानेही दक्षता दाखवत प्रत्येक केंद्राबाहेर रुग्णवाहिका सज्ज ठेवली होती. वैद्यकीय पथकेही सतर्क अवस्थेत तैनात करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना कोणतीही आरोग्यविषयक अडचण निर्माण झाल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी ही व्यवस्था करण्यात आली होती. दरम्यान, परीक्षा केंद्राबाहेर पालकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. आपल्या पाल्याच्या भवितव्याशी निगडित असलेल्या या परीक्षेमुळे अनेक पालक परीक्षा संपेपर्यंत केंद्राबाहेरच थांबले होते. विद्यार्थ्यांनीही आत्मविश्र्वासाने परीक्षा दिल्यानंतर समाधान व्यक्त केले.

नीट परीक्षा (UDGIR NEET EXAM) ही केवळ प्रवेश परीक्षा नसून देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय करिअरचा पाया मानली जाते. वाढती स्पर्धा, मर्यादित जागा आणि गुणवत्तेचा कठोर निकष यामुळे प्रत्येक गुण महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच अशा परीक्षांमध्ये प्रशासनाकडून करण्यात येणारी सुरक्षा आणि नियोजनाची व्यवस्था अत्यंत महत्त्वाची मानली जाते. उदगीरमध्ये यंदा पोलीस, आरोग्य आणि प्रशासकीय यंत्रणांनी केलेले प्रभावी नियोजन विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक ठरले.

# तालुक्यातील दोन रस्त्याच्या कामांसाठी ९ कोटींचा निधी मंजूर

## उजनी - एकंबी, कार्ला - कुमठा रस्त्याचा समावेश



तभा वृत्तसेवा

औसा दि.२३ जून : औसा मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून राज्य शासनाने विधानसभेत सादर केलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये औसा तालुक्यातील दोन महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणा कामांसाठी एकूण ९ कोटींच्या निधीस मंजुरी दिली आहे. या निधीमुळे अनेक वर्षांपासून खराब अवस्थेत असलेल्या रस्त्यांचे नूतनीकरण होणार असून परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या मंजूर झालेल्या कामांमध्ये एकंबी ते उजनी रस्त्यासाठी ६ कोटी तर कारला-कुमठा ते निलंगा रस्त्याच्या सुधारणेसाठी ३ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. या दोन्ही रस्त्यांची अवस्था गेल्या काही वर्षांत अत्यंत खराब झाली होती. रस्त्यांवरील खड्डे, तुटलेले डांबरीकरण आणि अपुऱ्या दुरुस्तीमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात या मार्गांवरून प्रवास करणे धोकादायक बनत होते. आमदार अभिमन्यू पवार यांनी राज्य शासनाकडे वारंवार पाठपुरावा करून या रस्त्यांची दुरुस्ती व सुधारणा कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर या कामांचा समावेश पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आला असून निधीस मंजुरी मिळाली आहे.

एकंबी, उजनी, कारला, कुमठा, तसेच परिसरातील अनेक गावांतील नागरिकाना या रस्त्यांचा फायदा होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना शेतमालाच्या वाहतुकीसाठी, विद्यार्थांना शिक्षणासाठी तसेच व्यापारी आणि नागरिक विविध कामांसाठी या मार्गांचा चांगला फायदा होणार आहे.

या रस्त्यांची सुधारणा झाल्यानंतर वाहतुकीचा वेग वाढणार असून अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम होऊन आर्थिक आणि सामाजिक विकासालाही चालना मिळणार आहे.या कामांमुळे शेतकऱ्यांना बाजारपेठांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होईल. व कृषी उत्पादनांच्या वाहतुकीवरील खर्च कमी होईल. तसेच विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक केंद्रांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचता येईल. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा, व्यापारी व्यवहार आणि शासकीय कामकाजासाठीही या रस्त्यांचा मोठा फायदा होणार आहे.या रस्त्यासाठी निधीची मंजुरी मिळाल्यानंतर स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून अनेक ग्रामस्थांनी आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याचे कौतुक केले आहे.

## जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळा सकाळच्या सत्रात



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जून : एल-निनोच्या प्रभावामुळे लातूर जिल्ह्यात यावर्षी अद्यापपर्यंत पाऊस पडला नाही. सद्यस्थितीत उन्हाची तीव्रता कायम आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक समस्या उद्भवून नये व विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे हित लक्षात घेता आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतूदीस अनुसरून लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळा पुढील आदेशापर्यंत सकाळी ८ ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत सकाळच्या सत्रात करण्यात यावी, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिले आहेत.

शैक्षणिक सत्र २०२६-२७ मध्ये दि. १५ जूनपासून शाळा नियमित सुरु झाल्या आहेत. एल-निनोच्या प्रभावामुळे जिल्ह्यात अद्यापपर्यंत पाऊस पडलेला नाही. उन्हाची तीव्रता कायम आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्र्न उद्भवू नये म्हणून जिल्ह्यातील मराठी, हिंदी, उर्दु, इंग्रजी या सर्व माध्यमांच्या शाळा व सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व अभ्यासक्रम चालविणाऱ्या शाळांची वेळ पुढील आदेशापर्यंत सकाळी ८ ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत राहिल, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दि. २२ जून रोजी शिक्षणाधिकारी प्राथमिक, शिक्षणाधिकारी माध्यमिक, शिक्षणाधिकारी, लातूर शहर महानगरपालिका यांना दिलेल्या पत्रात नमुद केले आहे.

दरम्यान शैक्षणिक वर्ष २०२६-२७हे रितसर सुरु झालेले असले तरी एल निनोच्या प्रभावामुळे पावसाळा सुरु होऊनही अद्याप पाऊस पडला नाही. तीव्र उन्हामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्र्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील सर्वच माध्यमांच्या शाळा सकाळच्या सत्रात कराव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघाच्या वतीने शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. त्याची दखल घेत आमदार विक्रम काळे यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक, शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्यासह जिल्हाधिकारी यांच्याकडे सकाळच्या सत्रात शाळा भरवण्याची मागणी केली होती. अखेर जिल्हाधिकरी यांनी दि. २२ जून रोजी विशेष पत्राने जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळा सकाळच्या सत्रात करण्याचे आदेश दिले. त्यामुळे आजपासून जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळा सकाळच्या सत्रात भरणार आहेत.

## लातूर फार्मसी महाविद्यालयाचे घवघवीत यश



तभा वृत्तसेवा

औसा दि. २३ जून : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या पदवी उन्हाळी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून श्री वेताळेश्र्वर शिक्षण संस्था संचलित, लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाने या वर्षीही उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.तर अनेक विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.

महाविद्यालयातून अंतिम वर्षाच्या निकालात महाविद्यालयातून श्रुती जोगदंड ८.५४ प्रथम ,योगिता पाटील ८.५३ द्वितीय, मारियम शेख ८.१८ तृतीय तसेच तृतीय वर्षाच्या निकालात सादिया फकीर ८.१५ प्रथम, मीरा मुंडे ८.१२ द्वितीय,तृतीय क्रमांक शुभांगी दंडवते ८.०८ तृतीय. द्वितीय वर्षाच्या निकालात मुस्कान डोंगरे हिने ८.८० गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला, निकिता कदम ८.३१ द्वितीय, तर वैभवी जाधव ७.९२ हिने तृतीय क्रमांक पटकावला.

या गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे,सचिव वेताळेश्र्वर बावगे,संचालक नंदकिशोर बावगे,संचालिका डॉ.माधुरी बावगे,प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला प्रा. सुप्रिया जाधव, प्रा.माधुरी पोळकर, प्रा. मनकरणा कराळे, प्रा स्नेहजा भालेराव प्रा.भागवत सोमवंशी आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले करून पुढील शैक्षणिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

## उद्यापासून मान्सून सक्रीय

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२३ जून : येत्या २५ जूनपासून मान्सून जिल्ह्यात सक्रीय होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला असून गेल्या काही दिवसांपासून रेंगाळलेल्या मान्सूनच्या प्रवासाला आता गती मिळणार आहे .

जूनच्या सुरुवातीला अपेक्षित पाऊस न झाल्याने तापमानात वाढ झाली होती .२५ जूनपासून हवामानात अनुकूल बदल होऊन पावसाची तीव्रता वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे .

येत्या २५ जून ते १ जुलै या दरम्यान लातूर सह संपूर्ण मराठवाड्यात विजांच्या कडकडाटात मुसलधार पाऊस पडू शकतो घाई घाईने पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते . त्यामुळे हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच शेती विषयक निर्णय घेण्याचे आवाहन करण्यात आले असून २५ जून नंतर अपेक्षित पावसामुळे पाणी स्थितीत सुधारणा होण्यास मदत होणार आहे .

## उदगीरात कॅन्सर रोग निदान तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २३ जून : रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल, विवेकानंद कॅन्सर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल लातूर व साई हॉस्पिटल उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ जून रोजी कॅन्सर तपासणी व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. याच दिवशी विविध आजाराची तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचेही आयोजन करण्यात आले असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महिलांमधील वाढणारा स्तनाचा व गर्भाशयाचा कॅन्सर आणि पुरुषामधील तोंडाचा कॅन्सर यांचे लवकर निदान व्हावे यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तोंड पूर्ण उघडण्यास त्रास होणे, शरीरावर किंवा स्तनात न दुखणारी गाठ येणे, वेगाने भूख मंदावणे आणि वजन कमी होणे, अंगावरून पांढरे /लाल पाणी जाणे, आवाजात बदल होणे, गिळताना त्रास होणे अशी अनेक लक्षणं आढळून आलेल्या रुग्णाची याठिकाणी तपासणी होऊन मार्गदर्शन केले जाणार आहे.

या शिबिरात लातूर येथील कॅन्सर तज्ञ् डॉ. ब्रिजमोहन झंवर, वैद्यकीय संचालक डॉ. अरुणा देवधर, ऍड. अनिल अंधोरीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

याच शिबिरात विविध आजाराची तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात अपेंडिक्स, हायड्रोसील, हर्निया भगंदर, मूळव्याध, फिशर, विविध प्रकारच्या गाठी, पित्ताशय काढण्याची शस्त्रक्रिया आदी आजाराची तपासणी व त्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या शिबिरात रुग्णाची तपासणी व शस्त्रक्रियेसाठी कोणताही खर्च लागणार नाही. भुलतज्ञ डॉक्टरांची फीस व औषधी रुग्णांनी स्वखर्चाने घ्यायची आहेत. या शिबिरात डॉ. माधव चंबुले यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ञ् डॉक्टरांची टीम रुग्णाची तपासणी करणार आहे.

उदगीर येथील शेल्हाळ रोडवरील साई हॉस्पिटल येथे शुक्रवार दि. २६ जून रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत हे शिबीर चालू राहणार आहे. या शिबिराचा गरजूनी लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी प्रशांत मांगुळकर यांनी केले.

या पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष मोतीलाल डोईजोडे, सचिव विक्रम हलकीकर, प्रोजेक्ट चेअरमन विशाल जैन, रवींद्र हसरगुंडे, विजय पारसेवार, प्रमोद शेटकार आदी उपस्थित होते.

## कै. रसिका महाविद्यालयाच्या राजरत्न सुरवसे खेळाडूंची मुंबई पोलीस दलात निवड



तभा वृत्तसेवा

देवणी दि. २३ जून : कै. रसिका महाविद्यालय देवणी येथील महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी राजरत्न सुरवसे यांची मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे.

खेळाडूंच्या या यशाबद्दल संस्थासचिव गजानन भोपणीकर यांच्या शुभहस्ते राजरत्न सुरवसे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे , क्रीडा संचालक प्रा.डॉ. सचिन चामले, अभिषेक केदासे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी राजरत्न सुरवसे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# चाकूरात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात

## शरीर सदृढ राहण्यासाठी योग आवश्यक : योग शिक्षक गोलावार



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २३ जून : चाकूरात आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी योगशिक्षक धनराज गोलावार यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून शरीर सदृढ राहण्यासाठी रोज नित्य योगासन करणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. २१ जून जागतिक योग दिनानिमित्त येथील श्री. विश्र्वशांती धाम ओंकारेश्र्वर मंदिराच्या सभागृहात एक दिवसीय योग शिबिराचे आयोजन पतंजली योग समिती,तहसील कार्यालय,रोटरी क्लब, पोलीस स्टेशन, प्रजापिता ब्रह्मकुमारीज,भारतीय जनता पार्टी व नगरपंचायत कार्यालय चाकूर यांच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात आले होते.

एकदिवसीय योग शिबिराचे दिप प्रज्वलन ब्रह्मकुमारीज विश्र्व विद्यालयाचे बहनजी ज्योती दिदी,ज्येष्ठ पत्रकार प्रा,अशोकराव शिंदे,महिला पतंजलीच्या जिल्हाध्यक्षा ,सुमन पवार,रोटरी क्लबचे चंद्रशेखर मुळे,भाजपा मंडल अध्यक्ष सिद्धेश्र्वर पवार यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली.

यावेळी योग शिक्षक धनराज गोलावार यांच्या मार्गदर्शनाखाली योगाचे प्रशिक्षण देण्यात आले,या योग प्रशिक्षणाला पतंजलीचे तालुका प्रभारी ओमप्रकाश लोया, तालुका प्रभारी संगीता फुलारी,रोटरी क्लबचे सागर रेचवाडे, गुणवंतराव जानकर,सुरज सोनटक्के,राजिव डिगोळे,बाळू माने,नागेश शिंदे,गिरीधर सूर्यवंशी,नविन पाटील, राजू शिंदे,योगीराज स्वामी,वसंत भोसले,ड. सुधाकर मोतीपवळे,गोविंद काथवटे,रत्नमाला नंदागवळे,चंद्रकला केंद्रे,शारदा मिरजकर, नंदनी धनशेट्टे,गोदावरी शेटे यांच्यासह योग प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थिती होते,यावेळी प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे संचलन सुरज सोनटक्के यांनी केले तर आभार चंद्रशेखर मुळे यांनी मानले या एक दिवसीय योग शिबिरास शहरातील योग प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिव्हाळा ग्रुपतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

### निरोगी वृद्धापकाळासाठी दररोज योगसाधना आवश्यक : डॉ. जैद हामजा



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २३ जून : निरोगी आयुष्यासाठी विशेषतः निरोगी वृद्धापकाळासाठी दररोज केवळ दहा ते विस मिनिटे योगासाठी दिली तरी शरीर आणि मनावर त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतात. त्यामुळे निरोगी जीवनासाठी नियमित योगासने करण्याची सवय प्रत्येकाने लावावी, असे प्रतिपादन उदगीर येथील प्रसिद्ध फिजिओथेरपिस्ट डॉ. जैद हामजा यांनी केले.

ते जिव्हाळा ग्रुप, उदगीर यांच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय योग दिन' तसेच बाबुराव वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. राधाकृष्णन प्राथमिक विद्यालय उदगीर येथे आयोजित योग शिबिरात मार्गदर्शन करत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटीचे सचिव देविदासराव नादरगे होते. व्यासपीठावर बाबुराव वाघमारे, डॉ. असगर शेख आणि जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष विश्र्वनाथराव बिरादार-माळेवाडीकर उपस्थित होते.

यावेळी बाबुराव वाघमारे यांचा वाढदिवसानिमित्त यथोचित सत्कार करण्यात आला. विठ्ठलराव फुलसे, शंकरराव साबणे आणि डॉ. अशोक दारनुळे यांनी गीत सादर करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

योग शिबीरा नंतर मार्गदर्शन करताना डॉ. अनिल भिकाने म्हणाले की, योगसाधनेमुळे मनुष्य शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त राहतो. तर दशरथराव शिंदे यांनी आरोग्यदायी दीर्घायुष्यासाठी योगसाधना अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोपात देविदासराव नादरगे यांनी उत्तम आरोग्यासाठी लवकर झोपणे, लवकर उठणे आणि नियमित व्यायाम करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत बिडवई यांनी केले, तर आभार प्रदर्शन मनोहर कुलकर्णी यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पांडुरंग बोडके, मुख्याध्यापक ज्ञानोबा कुंडगीर तसेच विद्यालयातील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

या शिबिरात डॉ जैद यांचेसह विद्यार्थ्यांच्या पालक विजया सोमवंशी यांनी योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली. जिव्हाळा ग्रुपचे सदस्य रमाकांत बनशेळकीकर, सोपानराव माने, दिलीप कंधारे, नवनाथराव पाटील, चंद्रकांत रोडगे, चंद्रकांत पांचाळ यांच्यासह शाळेतील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उद्या मोफत त्वचा तपासणी शिबीर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जून : वर्ल्ड विटिलिगो डे चे औचित्य साधून त्वचेवरील पांढऱ्या डागांच्या समस्येने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी एक विशेष मोफत तपासणी आणि मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले आहे .

उद्या २५ जून रोजी हे शिबिर संपन्न होणार असून तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांना मोफत तपासणीचा लाभ घेता येणार आहे . शिबीर शहरातील डॉ . अजय नारायणकर यांच्या अथर्व स्कीन क्लिनीक येथे आयोजित केले आहे .

शिबीर दोन ठिकाणी होत असून पहिले ठिकाण पुण्य बसस्थानका समोर सकाळी१० ते दुपारी२ . तर दुसरे ठिकाण सिद्धी विनायक मंदिरा समोर सांयकाळी६ ते८ या वेळेत होणार आहे .



## विविध वृत्त...

### समाज कल्याण वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांचा आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ जून : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त समाज कल्याण विभागाच्यावतीने रविवारी येथील मार्केट यार्ड, शिवनेरी गेट समोरील येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात योग दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित विशेष योग सत्रात समाज कल्याण वसतिगृहातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. योगाचार्य नंदिनी पडीले यांच्या मार्गदर्शनाखाली हे योग सत्र पार पडले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवशेटवार हे होते. तसेच याप्रसंगी समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, सुवर्ण जगताप यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रीमती पडीले म्हणाल्या, योग आणि व्यायामामुळे आपली स्मरणशक्ती, मानसिक स्वास्थ्य आणि शारीरिक स्वास्थ्य वाढते. हीच आपल्या आयुष्यातील सगळ्यात मोठी संपत्ती आहे. विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर उठून आपली जीवनशैली बदलणे आणि सकारात्मक जीवनशैली स्वीकारण्यासाठी नियमित योग करणे अत्यंत जरुरी आहे.

या विशेष शिबिराला वर्षा चौधरी, मुक्ता किर्दल, सनराईज योगा स्टुडिओच्या महिला सदस्या यांच्यासह समाज कल्याण विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि वसतिगृहाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महायुतीचे नवनिर्वाचित आ. बसवराज पाटील यांचे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जून : धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधान परिषदेवर प्रचंड बहुमताने विजयी झालेले भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील मुरुमकर यांचे निकाल जाहीर होताच भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.

विधान परिषद निवडणुकीतील धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून भाजपा महायुतीच्या वतीने भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांना उमेदवारी जाहीर झाल्यापासून ही निवडणूक एकतर्फीच होणार असे चित्र स्पष्ट होते. लातूर जिल्ह्यासह बीड धाराशिव या तिन्ही जिल्ह्यातून बसवराज पाटील यांना महायुतीच्या नेत्यासह मतदारांनी मोठे समर्थन दिले होते. या निवडणुकीची मतमोजणी सोमवारी सकाळी धाराशिव येथे झाली.

धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील हे प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्याचे घोषित होतात भाजपा सह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. याप्रसंगी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून पेढे भरून नवनिर्वाचित विधान परिषदेचे आमदार बसवराज पाटील यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी माजी आमदार ज्येष्ठ मार्गदर्शक सुरजीतसिंह ठाकुर, या मतदार संघाचे माजी आमदार सुरेश धस, प्रदेश भाजपाचे दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंके, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, अभिषेक आकनगिरे, बन्सी भिसे, प्रताप पाटील, राजकिरण साठे, भैरवनाथ पिसाळ यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

## अनधिकृत बॅनर लावणाऱ्यांना ५० हजार रुपये दंड




तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जून : शहरातील अनधिकृत बॅनरवर कारवाई करण्यासाठी मनपा ने सर्व झोनमार्फत विशेष मोहीम हाती घेतली असून अनधिकृत बॅनर लावणाऱ्यांवर५० हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे . शहरातील नागरिकांना, संघटना ना, राजकीय पक्ष यांना मनपा तर्फे आवाहन करण्यात येते की, मनपाने निश्र्चीत करून दिलेल्या जागे व्यक्तिरिक्त सार्वजनिक जागेवर मनपाच्या परवानगी शिवाय कोणत्याही ठिकाणी पोस्टर्स, बॅनर्स, होल्डींग, कमानी लावू नये .

कायदयाचे उल्लंघन केल्यास दंडनीय कार्यवाही करून संबंधिताविरुद्ध पोलीस कार्यवाही करण्यात येईल . म्हणून मनपाची रितसर परवानगी घेऊनच पोस्टर्स, बॅनर्स, होल्डिंग, कमानी लावाव्यात . परवानगी घेतल्यानंतर सदर जाहिरातीवर मनपा चा जाहिरात क्रमांक आणि दिलेला कालावधी दर्शविण्यात यावा, असे शहरातील प्रिंटर्स यांची बैठक घेऊन कळविलेले आहे . तसेच शहरामध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमा निमित्त लावायची पोस्टर्स, बॅनर, होल्डिंग, कमानी उभारण्यापूर्वी रितसर संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांची घ्यावी.

न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन मनपा प्रशासनास सहकार्य करावे.

### जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार लक्ष्मण गणपती खाडप, रा.लखमापूर, पोस्ट मोरवड, ता. रेणापूर जि.लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना फतेसिंग कल्याणराव गायकवाड, रा. उजनी, ता.अंबाजोगाई जि.बीड यांनी खरेदीखत दस्त क्रं. ल.त.र २/७८०९/२३, दि.१३/०९/२०२३ ईसवी अन्वये खरेदी मालकी व कब्जेवहिवाटीचा प्लॉट मौजे. हरंगुळ (बु.), ता.जि. लातूर येथील जमीन गट नंबर ८५/१ पैकीचा एन.ए झालेला एन.ए नंबर २००५/जेएमबी/लातूर/सीआर ६४९, दि.२६/०८/२००५ ईसवी अन्यये मे. सब डिव्हीजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेला प्लॉट याचा लेआऊट नंबर अकृषी/मी. हरंगुळ चु/ता.लातूर/गट नं.८५/नरला /१६४३, दि.१९/०८/२००५ ईसवी अन्वये मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट नंबर २८ पुर्ण याचा ग्रा. मि. नंबर ६५३३ असून याची लांबी पूर्व पश्र्चिम १२.१९ मी. व रूंदी दक्षिण उत्तर १० मी. असून याचे एकूण क्षेत्रफळ १२१.९० चौ.मी. आहे.

याची चतुः सीमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस - प्लॉट नंबर २१ खामगावकर यांचा, पश्र्चिमेस ६ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस :- प्लॉट नंबर २७ जाधव यांचा, उत्तरेस प्लॉट नंबर २९ उमाकांत मळगे यांचा.

येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन तोंडी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजायाचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निजोंखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक २३/०६/२०२६
तर्फे
ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक, लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
लक्ष्मण गणपती खाडप
रा.लखमापूर, पोस्ट-मोरवड,
ता. रेणापूर जि.लातूर
मो. नं. ९४२३२३५९२९

## जि. प. प्रा. शाळा शासकीय वसाहत लातूर येथे शालेय गणवेश वाटप

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जून : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शासकीय वसाहत लातूर येथे शालेय गणवेश वाटप जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शासकीय वसाहत लातूर येथे नुकतेच जि.प. अध्यक्ष उषाताई संभाजीराव पाटील तळेगावकर, शिक्षणाधिकारी प्रमोद पवार, संभाजीराव पाटील तळेगावकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले.

इयत्ता दुसरीतील विद्यार्थी हर्षवर्धन दहिवडी हा अक्षरगंगा या स्पर्धा परीक्षेत प्रथम यश प्राप्त केल्याबद्दल त्याचाही सत्कार करण्यात आला तसेच शाळा व किचन शेडची पाहणी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष म्हणाले की, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शासकीय वसाहत लातूर येथे वर्ग खोल्यांची गळती, किचन शेड आणि रॅम साठी भविष्यात विशेष बाब म्हणून आर्थिक तरतूद केली जाईल. गेल्या वर्षी शाळेत संपन्न झालेले वार्षिक स्नेहसंमेलन शैक्षणिक सहल व शैक्षणिक साहित्याचे वाटप याबद्दल मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सुनील कुमार हाके, मनीषा महाजन, हराळे नामदेव यांनी परिश्रम घेतले.

## प्रकाशकांनी ३० जून पर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावे

### विवरणपत्र दखल न केल्यास दहा हजारांचा दंड

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ जून : प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र प्रेस सेवा पोर्टल वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळविले आहे.

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्र्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टार जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांनी ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन दाखल करावे. या मुदतीनंतर विवरणपत्र सादर न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल,असेही प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांमध्ये नमूद केले आहे.

### नाल्यांची सफाई अपूरी, पाणी तुंबण्याची भीती

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जून : पावसाळवाची सुरुवात होताच शहरातील अनेक भागांतील नाल्यांमध्ये कचरा, प्लास्टीक व गाळ साचलेला असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी नाल्याची सफाई अपुरी राहिल्याने मुसळधार पाऊस पडल्यास पाणी तुंबण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे नागरिकांमध्ये चिता व्यक्त्त होत आहे. नाल्यांची संपूर्ण सफाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पोलिस प्रशिक्षण केंद्राच्या मैदानावर योगदिनाचा उत्साह



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जून : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव येथील मैदानावर हजारो पोलिसांच्या उत्स्फूर्त सहभागाने योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

पहाटे ५.३० वाजता सुरू झालेल्या या योग सत्राचे मार्गदर्शन योगाचार्य नंदिनी पडीले यांनी केले. यावेळी पोलीस प्रशिक्षण केंद्राचे अधिकारी, प्रशिक्षणार्थी पोलीस विद्यार्थी तसेच सनराईज योगा स्टुडिओच्या महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना योगाचार्य पडीले म्हणाल्या, शरीर, आत्मा आणि मन यांचा समतोल साधणारी क्रिया म्हणजे योग. आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवायचे असतील, तणावमुक्त राहायचे असेल आणि कर्तव्य बजावताना एकाग्रता टिकवायची असेल, तर दररोज योग करणे अत्यावश्यक आहे.

पोलीस दलासारख्या शिस्तबद्ध आणि तणावपूर्ण सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी योग ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. उगवत्या सूर्याच्या साक्षीने हजारो पोलिसांनी एका तालात, एका श्र्वासात योगासने व प्राणायाम केल्याने मैदानावर एक अद्भुत ऊर्जा निर्माण झाली होती. या उपक्रमामुळे पोलिसांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीला चालना मिळणार असून, 'निरोगी रक्षक, बलवान राष्ट्र' हा संदेश यातून देण्यात आला.

## शासकीय योजनांच्या माध्यमातून महिला बचतगट सक्षमीकरणासाठी प्रयत्न करा : जिल्हाधिकारी




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ जून : राज्य शासन महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवीत आहे. यासोबतच विविध शासकीय विभागांच्या योजनांमध्ये महिला बचतगटांनाही प्रोत्साहन देण्यात येत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाने (माविम) या विभागांशी समन्वय ठेवून महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज येथे दिल्या.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संजय इंगळे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम, जिल्हा पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. श्रीधर शिंदे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक प्रमोद पाटील, कौशल्य विकास सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी, जिल्हा ग्रामउद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मनरेगामधून रोपवाटिका निर्मिती, कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पोकरा प्रकल्पात समाविष्ट गावांमध्ये अवजारे बँक यासाठी महिला बचतगटांना प्राधान्य देण्यात येते. त्यामुळे महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून संबंधित विभागाशी समन्वय साधून या योजनांचा लाभ महिला बचतगटांना द्यावा. यासोबतच कुक्कुटपालन, शेळीपालन आदी व्यवसाय उभारणीसाठीही बँकेचे सहकार्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले.

प्रारंभी महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे यांनी महामंडळाच्या जिल्ह्यातील कामकाजाची माहिती दिली.

## वार्तांकन करत असताना पत्रकारांना मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करा

# पत्रकारांचे पोलीस अधीक्षकांसह मुख्यमंत्र्यांना निवेदन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जून : लातूर येथील अस्थी रोग तज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार यांच्या हॉस्पिटलमध्ये एका रुग्णाचा संशयास्पद मृत्यू झाल्यांनतर त्या ठिकाणी वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांना पोलीस अधिकाऱ्यांकडून मारहाण, शिवीगाळ करण्यात आली. त्यावेळी सदर पोलीस अधिकाऱ्यांनी कायद्याची बाजू समजून न घेता अरेरावी केली. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी लातूर जिल्ह्यातील पत्रकारांनी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्यासह मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रति उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईआदींना पाठवण्यात आल्या आहेत.

निवेदनात म्हंटले आहे, शुक्रवार, दि. १९ जून रोजी येथील पोद्दार हॉस्पिटलमध्ये भरती असलेल्या बालाजी चव्हाण या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यावेळी त्याच्या नातेवाईकांनी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे सदर व्यत्ति मयत झाल्याचा आरोप केला होता. त्याचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या काही पत्रकारांना पोलीस उपाधीक्षक समीर साळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज जिरगे यांनी धक्काबुकी, मारहाण करत शिवीगाळ केली. लातूर जिल्ह्यात यापूर्वीही पत्रकारांना पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून वार्तांकन करताना आडविणे, अर्वाच्य भाषेत बोलणे, मारहाण करणे आदी प्रकार घडले आहेत. सदर बाब लोकशाहीत अशोभनीय आहे. त्यामुळे संबंधितांची खातेनिहाय चौकशी करत सात दिवसात त्यांचे निलंबन करण्याची मागणी पत्रकारांकडून करणात आली आहे. निवेदनाची दाखल नाही घेतल्यास लोकशाही मार्गाने पत्रकारांनी उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष अशोक देडे, अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे लातूर जिल्हाध्यक्ष नरसिंग घोणे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, डिजिटल विंग जिल्हाध्यक्ष मनीष हजारे, नेताजी जाधव, रामप्रसाद काबरा, आनंद दणके, अतिश कांबळे, हरून मोमीन, अंबादास करकरे, मोहसीन खान, शिवाजी कांबळे, रवी बिराजदार, यशवंत पवार, सौदागर अजित, शरद पवार, चंद्रकांत सूर्यवंशी, सोनवणे संतोष, वाल्मीक केंद्रे, नितीन बनसोडे, संदीप गवळी, सुनील कांबळे, शिंदे लहू, रोहिदास कलवले, शेख, विक्रांत शंके, समीर शेख, शेख इस्माईल, मारुती पवार, विष्णू अष्टेकर, वामन पाठक, प्रमोद सुरवसे, शिवाजी मिसाळ, शरद राठोड, परवेज सय्यदआदींच्या सह्या आहेत.

# देगलूर-कर्नाटक सीमा मार्गास बजेट मंजुरी; खा. डॉ. अजित गोपछडे यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ जुन -**

देगलूर ते कर्नाटक राज्यसीमा या महत्त्वपूर्ण मार्गाच्या विकासासाठी बजेट मंजुरी प्राप्त झाल्यानंतर नांदेडबिदर महामार्गाच्या उन्नतीकरणाला नवे बळ मिळाले असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील टप्प्यात राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी सोमवारी (दि. २२ जून) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेऊन या विकासकार्याच्या संकल्पनेवर आधारित विशेष स्मृतिचित्र भेट देत त्यांचा सत्कार केला व मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

त्यानंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचीही भेट घेऊन या विकासकार्याशी संबंधित विशेष स्मृतिचित्र प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला गती मिळवून देण्यासाठी दिलेल्या सहकार्याबद्दल खा. डॉ. गोपछडे यांनी त्यांचे आभार मानले.

या प्रकल्पाअंतर्गत देगलूरकरडखेडमरखेल हाणेगाव ते कर्नाटक राज्यसीमा या मार्गाचा दर्जेदार विकास करण्यात येणार असून, नांदेडबिदर महामार्गावरील सुमारे २० किलोमीटरचा अत्यंत जीर्ण व दयनीय अवस्थेतील भाग प्रथमच आधुनिक महामार्गाच्या दर्जानुसार विकसित करण्यात येणार आहे. गत ५० वर्षापासून या मार्गावर सर्वसमावेशक आणि उच्च दर्जाचे काम झाले नसल्याने प्रवाशांना मोठ्या



अडचणींचा सामना करावा लागत होता. आता हा मार्ग नव्या स्वरूपात विकसित होऊन अधिक सुरक्षित, सुलभ आणि वेगवान प्रवासाचा अनुभव देणार आहे.

तख्त सचखंड श्री हजूर साहिब, नांदेड ते गुरुद्वारा श्री नानक झिरा साहिब, बिदर या दोन महत्त्वाच्या शीख तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या या मार्गाला धार्मिक, सांस्कृतिक तसेच आर्थिक दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. देश-विदेशातून दर्शनासाठी येणारे लाखो शीख भाविक, पर्यटक तसेच नांदेडबिदर मार्गावर नियमित प्रवास करणारे विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना या प्रकल्पाचा मोठा लाभ होणार आहे. सीमावर्ती भागातील व्यापार, पर्यटन आणि सर्वांगीण विकासालाही या प्रकल्पामुळे नवी चालना मिळणार आहे.

या महामार्गाचे व्यापक महत्त्व लक्षात घेऊन प्रकल्पास आवश्यक गती आणि पाठबळ दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी प्रत्यक्ष भेटून मनःपूर्वक आभार मानले.

खा. डॉ. गोपछडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे एशियन डेव्हलपमेंट बँक सहाय्यित योजनेअंतर्गत या मार्गासाठी आवश्यक निधीला मंजुरी मिळाली असून, लवकरच प्रत्यक्ष कामांना प्रारंभ होणार आहे. परिणामी महाराष्ट्रकर्नाटक सीमावर्ती भागाच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, नांदेडबिदर महामार्ग भविष्यात आधुनिक, सुरक्षित आणि प्रवाशांना सुखद अनुभव देणारा दर्जेदार मार्ग म्हणून विकसित होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या प्रसंगी खा. डॉ. अजित गोपछडे म्हणाले की, तख्त सचखंड श्री हजूर साहिब, नांदेड आणि गुरुद्वारा श्री नानक झिरा साहिब, बिदर या दोन पवित्र तीर्थक्षेत्रांना जोडणारा हा महामार्ग केवळ रस्ता नसून धार्मिक पर्यटन, सीमाभागातील व्यापार, शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाला नवी गती देणारा विकासाचा महत्त्वपूर्ण दुवा ठरणार आहे. सीमावर्ती भागाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल.असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# दुष्काळी परिस्थितीत चारा उत्पादनास चालना; पशुपालकांना वैरण बियाण्यांचे वाटप



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ जुन -**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६२०२७ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या चारा उत्पादन योजनेच्या माध्यमातून पशुपालकांना प्रातिनिधिक स्वरूपात वैरण बियाण्यांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमास जिल्हा नियोजन अधिकारी, नांदेड, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तसेच पशुधन विकास अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी चारा उत्पादनाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पशुपालकांनी मुरघास (सायलेज) निर्मिती व वापराला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.

याशिवाय मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना अंतर्गत उपलब्ध सुविधांचा लाभ घेऊन जास्तीत जास्त पशुपालक शेतकऱ्यांनी पशुपालन व्यवसाय अधिक सक्षम व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात उपस्थित पशुपालकांना चारा उत्पादन व पशुधन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## किनवटमध्ये जागतिक योग दिन उत्साहात

**किनवट** -दि २१ जून रोजी जागतिक योग दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी किनवट शहर मंडळाच्या वतीने एन. के. गार्डन येथे भव्य योग शिबिराचे उत्स्फूर्त आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन योगासनांचा सराव केला. आमदार भिमराव केराम यांच्या खंबीर नेतृत्वाखाली आणि नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनात शहर मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांनी या यशस्वी शिबिराचे नेटके आयोजन केले होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्राचार्य आनंद सरतापे यांनी योगाचे मानवी जीवनातील आणि आरोग्यातील महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले. रोजच्या धावपळीच्या जीवनात शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी योग साधना किती गरजेची आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. या प्रसंगी स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने शिवराज रघुमामा, संयोजक विश्वास कोल्हारीकर, राजेंद्र भातनासे , सरचिटणीस बाळकृष्ण कदम, सागर पिसारीवार, जयराज वर्मा, विनोद मुंडे,कृष्णा पाटील, जगदिश तिरमनवार, नरसिंग तक्कलवार, राहुल दग्गुलवार, नगरसेवक संतोष मरसकोल्हे, कृष्णा कलकुटलवार, अक्षय पावडे आणि राम शेपुरवार आदींसह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.



## सहयोग सेवाभावी संस्था, विष्णुपुरी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**नांदेड** -सहयोग सेवाभावी संस्था, विष्णुपुरी नांदेड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटे सूर्योदयाच्या प्रसन्न वातावरणात सकाळी ६.३० वाजता योग सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांची प्रमुख उपस्थित होती. इंदिरा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करून त्यांचे दैनंदिन जीवनातील महत्त्व व आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. दोन तास चाललेल्या या योग सत्रामध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य आणि निरोगी जीवनशैलीसाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या कार्यक्रमाला कॅम्पसमधील सर्व महाविद्यालयांचे विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. योगाचा नियमित सराव करून निरोगी आणि संतुलित जीवन जगण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. बालाजी गिरगावकर, ळजछ डिजिटल झोनचे संचालक शिवानंद बारसे, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विजय नवघरे, , पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. ईशान अग्रवाल, इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचे प्राचार्य विक्रम ढोणे, मदर तेरेसा नर्सिंग स्कूलचे प्राचार्य सुनील पांचाळ, फिजिओथेरपी विभागप्रमुख डॉ. भार्गवी, प्रशासकीय अधिकारी स्वामी आणि शंकर मनाळकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या माध्यमातून योग हा केवळ व्यायाम नसून आरोग्य, शिस्त आणि सकारात्मक जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग असल्याचा संदेश देण्यात आला.



## अंकुर शिक्षण संस्थेच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम साहित्य वितरण शिबिर

**मुदखेड** -महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग एस.आर. ट्रस्ट मध्यप्रदेश व ऑलिमको मुंबई यांच्या संयुक्त विद्यामानाने मुदखेड तालुक्यातील अस्तीव्यंग, दिव्यांग व्यक्तीना कृत्रीम हात, पाय, क्लीपर्स यांचे मोजमाप व तात्काळ वितरण शिबाराचे आयोजन अंकुर शिक्षण संस्था नांदेड संचलित निवास मुकबधिर विद्यालय मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटक संदिप माळोदे साहेब, मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.नांदेड मा.अवधुत गंजेवार साहेब सहाय्यक आयुक्त दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी नांदेड शेखर देशमुख गटविकास अधिकारी पं.स. मुदखेड, संस्थेचे सचिव सग्राम सुर्यवंशी, निलेश बांगाळे विस्तार अधिकारी, संताजी भांडेकर, डॉ. रुपेश जाधव, (एस. आर. ट्रस्ट डायरेक्टर), डॉ. आकाश यादव ऑलिमको मुंबई, प्रहार संघटनेचे पदधिकारी अनिल शेटे, माधव पांचाळ, केशरताई शिंदे, गोविंदराव लोणे, साहेबराव निवडगे, शंकर शिंदे, नागोराव निखाते व शाळेचे कर्मचारी हनमंत गवलवाड (मुख्याध्यापक), सौ. सुनिता सुर्यवंशी (क.शि.), भास्कर वाघ (क.शि.), गणेश बामणे (वि.शि.), सतिश हाजारे (वि.शि.), कैलास जामुंदे (क.लि.), नागरबाई वाडेकर (स्वंयपाकी), दत्ता हसेवाड (काळजीवाहक), गजानन शिंदे (सेवक), विठ्ठल बोरगे (सेवक) इत्यादी उपस्थित होते. या शिबीराचे एकुण ११८ दिव्यांग व्यक्तीची तपासणी करुन ६५ लाभार्थ्यांना मोजमाप देऊन कृत्रीम अवयव वाटप करण्यात आले.



# नांदेडमध्ये 'नीट'च्या तयारीसाठी आलेली अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ जुन -**

पुणे जिल्ह्यातील मोशी येथील एक अल्पवयीन मुलगी नांदेड येथे नीट परीक्षेच्या तयारीसाठी आली असता, तिचे अज्ञात इसमाने फूस लावून अपहरण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून नांदेड येथील विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अशोक कोंडोजी चव्हाण (वय ४४ वर्ष, रा. मोशी, ता. जि. पुणे) यांची १५ वर्षे १० महिने वयाची मुलगी गेल्या महिनाभरापासून नांदेड येथे नीटचे क्लासेस करण्यासाठी आली होती. ती येथील श्यामनगर भागातील एका खोलीवर राहत होती. नेहमीप्रमाणे १५ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता ती क्लासेसला जाते असे सांगून खोलीवरून निघाली, मात्र ती वेळेवर परतलीच नाही. सर्वत्र शोध घेऊनही ती न सापडल्याने, कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिला अज्ञात कारणासाठी फूस लावून पळवून नेल्याची खात्रीशीर तक्रार तिच्या वडिलांनी पोलिसांत दिली. या तक्रारीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात गु.र.नं. २८१/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हेमंत देशपांडे करीत आहेत.




नांदेड - काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विशेष उपस्थितीत शेती व शेतकरी यांच्यावर अन्याय करणाऱ्या सरकार विरोधात व विविध मागण्यांसाठी जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर आसूड मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात खासदार तथा दक्षिण जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी सहभागी झाले.

# समुपदेशनाद्वारे जिल्ह्यात ८६ केंद्रप्रमुखांची नियुक्ती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ जुन -**

जिल्हा परिषद नांदेडच्या शिक्षण विभागामार्फत केंद्रप्रमुख मर्यादित स्पर्धा परीक्षेतील पदोन्नती प्रक्रियेनुसार जिल्ह्यातील रिक्त ८६ केंद्रप्रमुख पदांसाठी आज समुपदेशनाद्वारे नियुक्ती प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करण्यात आली. ही प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

शिक्षण संचालक, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानंतर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक तसेच पदोन्नत मुख्याध्यापक यांची लेखी परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षा निकालानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून पात्र व अपात्र यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी पात्र उमेदवारांना समुपदेशनाद्वारे पदस्थापना देण्याचा निर्णय जाहीर केला होता. यानुसार जिल्ह्यातील केंद्रप्रमुख संवर्गातील ८३ सर्वसाधारण व ३ दिव्यांग अशा एकूण ८६ रिक्त पदांसाठी आज समुपदेशन प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, उपशिक्षणाधिकारी नागराज बनसोडे व प्रज्ञा भवरे, प्रशासन अधिकारी राघवेंद्र मदनुरकर, शिवसांब चेंडू, मंगेश ढेंबरे, अनिल भेदे तसेच शिक्षण विभागातील अधिकारी व सर्व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील केंद्रप्रमुख पदांच्या मोठ्या प्रमाणावरील रिक्त जागा लक्षात घेऊन सर्व तालुक्यांतील रिक्त पदांचा ७५ टक्के तालुका समतोल साधत अनुशेष भरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे सर्व तालुक्यांमध्ये समप्रमाणात केंद्रप्रमुखांची नियुक्ती करणे शक्य झाले.

# प्रकाशकांनी विवरणपत्र दखल न केल्यास दहा हजारांचा दंड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ जुन -**

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र प्रेस सेवा पोर्टल वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळविले आहे.

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१) (ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टार जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांनी ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन दाखल करावे. या मुदतीनंतर विवरणपत्र सादर न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल,असेही प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांमध्ये नमूद केले आहे.

# सिडको- वाघाळा जलशुद्धीकरण केंद्र तातडीने दुरुस्ती करावे अन्यथा आंदोलन : ॲड.प्रसेनजीत वाघमारे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ जुन -**

मनपाच्या सिडको वाघाळा जलशुध्दीकरण केंद्राची पाहणी करुन तातडीने येथील सर्व दुरुस्ती करुन नागरीकांची होत असलेली गैरसोय दुर करावी अन्यथा १० जुलै पासून धरणे आंदोलन करण्याचा ईशारा सामाजिक कार्यकर्ते ॲड.प्रेसनजित वाघमारे यांनी कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग मनपा नांदेड यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



सिडको वाघाळा येथील जलशुध्दीकरण केंद्रातून सिडको हडको भागातील नागरीकांना पिण्याचे शुध्द'पाणी करुन पुरवठा केला जातो. येथील सध्य परिस्थीती अतिश्य हालाकाची झाली असुन येथील वॉटर ब्रिज मध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचला असल्याने त्या ठिकाणी लहान झाडे झुडुपे वाढले आहे. तसेच फिल्टर बेड,एयर ब्लोअर, फिल्टर वॉल इत्यादी हे सर्व मशिनरी मोडकळीस आल्या असल्याने पाणी पुरवठा करण्यास मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण झाली आहे, मशिन निष्क्रीय होत असल्याने पाण्याचे शुध्दीकरण व्यवस्थीत होत नाही. यांमुळे परिसरात अतिश्य विलंबाने अशुध्द पाण्याच्या पुरवठा होत आहे. वरील सर्व बाबींची बारकाईने विचार केल्यास नागरीकांची होत असलेली अडचण तात्काळ दुर होईल. वरील सर्व बाबींकडे जाणीपुर्वक लक्ष देवुन उच्च स्तरीय अधिकाऱ्यांच्या मार्फत जलशुध्दीकरण केंद्राची पाहणी करुन जलशुध्दीकरण केंद्रास योग्य रित्या कार्यन्वीत करावे अन्यथा आपल्या विरोधात मनपा कार्यालयाच्या समोर १० जुलै २०२६ रोजी धरणे आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी असा इशारा निवेदनाद्वारे ॲड.प्रेसनजित वाघमारे यांनी दिला आहे.

# १० वर्षांचा रेकॉर्ड मोडीत काढत चिंचोलकरांची 'सिंघम' कामगिरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ जुन -**

अवैध रेती आणि गौण खनिजाची छुप्या मार्गाने होणारी लूट रोखण्यासाठी नांदेड ग्रामीण पोलीसांनी आतापर्यंतची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे चे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या २० महिन्यांच्या कार्यकाळाने मागील १० वर्षांतील कारवाईचे सर्व रेकॉर्ड मोडीत काढले आहेत. चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या धडक मोहिमेमुळे परिसरातील वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.

**१० वर्षांची कामगिरी विरूद्ध २० महिन्यांचा झंझावात**

मिळालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, सन २०१५ ते २०२४ या तब्बल १० वर्षांच्या प्रदीर्घ काळात नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अवैध रेती उपसा आणि गौण खनिजाच्या वाहतुकीबाबत एकूण ५९ गुन्हे दाखल झाले होते. या १० वर्षांत एकूण ४ कोटी ७५ लाख ७२ हजार ५३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. तर पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पदभार स्वीकारल्यापासून अवघ्या २० महिन्यांच्या कालावधीत गुन्हेगारांवर असा काही वचक निर्माण केला की, त्यांनी तब्बल १५२ गुन्हे दाखल करून ६७ कोटी १३ लाख ८२ हजार ५५० रुपयांचा अवाढव्य मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवायांसह मुद्देमालात प्रचंड वाढ!**

पो.नि. चिंचोलकर यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची टक्केवारी पाहिली तर पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर कौतुकाचा वर्षाव होत आहे गुन्ह्यांमध्ये २५७ टक्केची वाढ झाली आहे. १० वर्षांत जेमतेम पावणेपाच कोटींचा मुद्देमाल जप्त झाला होता, तिथे चिंचोलकर यांनी आपल्या धडक मोहिमेद्वारे तब्बल १४११ टक्केची अफाट वाढ नोंदवत ६७ कोटींपेक्षा अधिकचा मुद्देमाल जप्त केला. हा आकडा मागील १० वर्षांच्या तुलनेत चौदा पटीहून अधिक आहे.



**खाकीची शान वाढवणारी कामगिरी**

शासकीय महसुलाची चोरी करणाऱ्या आणि पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या माफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी पो. नि. ओमकांत चिंचोलकर यांनी दाखवलेले धाडस आणि त्यांचे अचूक नियोजन हे पोलीस दलाची मान उंचावणारे ठरले आहे. रात्री-अपरात्री होणारी अवैध वाहतूक रोखण्यासाठी त्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून कारवाया केल्या. त्यांच्या या २० महिन्यांच्या झंझावाती कार्यकाळामुळे कायद्याचे राज्य काय असते, याचा प्रत्यय वाळू माफियांना आला आहे. पोलीस प्रशासनातील अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याच्या उल्लेखनीय कामाचा हा आलेख निश्चितच गौरवास्पद आणि आदर्शवत असाच आहे.

**भविष्यातही कारवाईचा बडगा कायम राहणार!**

नांदेड ग्रामीण हद्दीत कोणत्याही प्रकारचा अवैध धंदा, रेती चोरी किंवा गौण खनिजाची अवैध वाहतूक खपवून घेतली जाणार नाही. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कडक आणि कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाईल, असा सज्जड इशारा या कारवाऱ्यांच्या माध्यमातून नांदेड ग्रामीण पोलीसांनी दिला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सर्व आरोग्य संस्थांनी एनक्यूएएस मानांकनासाठी गुणवत्ता वृध्दीवर भर द्यावा

## नियामक मंडळाच्या बैठकीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जून**

जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व इतर आरोग्य संस्थांनी राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन (छटअड) प्राप्त करण्यासाठी आवश्यक निर्देशांकांनुसार पायाभूत सुविधा, सेवा गुणवत्ता आणि रुग्णाभिमुख कामकाजात सुधारणा कराव्यात. एनक्यूएएसच्या अनुषंगाने सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करून ३१ जुलै २०२६ पर्यंत आवश्यक पूर्तता करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्ह्यातील आरोग्य सेवांचा तसेच एनक्यूएएस मानांकन प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. राहुल गीते, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र पुरी, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिपक मोरे यांच्यासह संबंधित अधिकारी तसेच कार्यक्रम समन्वयक उपस्थित होते.

या बैठकीत राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन प्राप्त करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व आरोग्य उपकेंद्रांनी जबाबदारीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. आरोग्य संस्थांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी, दुरुस्ती व सुधारणा जिल्हा वार्षिक योजना तसेच उपलब्ध इतर निधीच्या माध्यमातून पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यासाठी आवश्यक मंजुरी प्रस्ताव तात्काळ सादर करण्यासही सांगितले.

रुग्णालयातील सेवा अधिक गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि रुग्णकेंद्री करण्यासाठी आवश्यक सुधारणा तातडीने राबविण्याची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी नमूद केले. आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यावर त्यांनी भर दिला. यावेळी बाह्यरुग्ण विभाग, प्रसूती सेवा, प्रयोगशाळा, औषध भांडार, प्रधानमंत्री आयुष्मान भारत कार्ड योजना, रुग्णालयातील विविध आरोग्य सुविधा, स्वच्छता व्यवस्थापन, मनुष्यबळ उपलब्धता तसेच वैद्यकीय यंत्रणेच्या एकूण कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. रुग्णांना दर्जेदार व वेळेवर आरोग्य सेवा मिळण्यासाठी सर्व स्तरांवर समन्वयाने कार्य करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन प्रक्रियेच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्यासाठी दर पंधरवड्याला बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले. संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व आरोग्य उपकेंद्रांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी व त्याबाबतचे अहवाल वेळेत सादर करावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

या कामात हलगर्जीपणा अथवा दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत जिल्ह्यातील आरोग्य संस्थांचे राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, सर्व संबंधितांनी या कामास सर्वोच्च प्राधान्य देऊन गुणवत्तावृद्धीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

# हिंगोलीच्या खासदाराच्या तोंडाला काळे फासणार- परमेश्वर मांडगे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जून**



नांदेडमध्ये कितीही गाजा-वाजा झाला असला, तरी संबंधित खासदारांनी आमच्या हक्काच्या मतांचा बाजार मांडला आहे. मतदारांशी प्रतारणा करून त्यांनी स्वतःचे मत विकले आणि दुसऱ्या पक्षात प्रवेश केला. जर त्यांच्यात हिंमत असती, तर त्यांनी आपल्या खासदारकीचा राजीनामा देऊन पक्षांतर करायला हवे होते. पक्षाशी आणि मतदारांशी केलेल्या या गद्दारीमुळे सर्वसामान्य शिवसैनिकांच्या काळजावर खोल घाव घातला गेला आहे, असा संतप्त आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे यांनी केला आहे. तसेच, या खासदाराला हिंगोलीत पाय ठेवू देणार नाही, ते जिल्ह्यात आल्यास शिवसैनिकांच्या वतीने त्यांचे तोंड काळे केले जाईल, असा थेट इशाराही त्यांनी दिला आहे.

संबंधित खासदारांनी नुकताच शिंदेसेनेत मोठा गाजा वाजा करीत पक्षप्रवेश केला यावर हिंगोली जिल्ह्यातील उद्धव सेनेच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नांदेडमध्ये प्रवेश सोहळा सुरू असतानाच, तिथल्या स्थानिक शिवसैनिकांनीही त्यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपला रोष व्यक्त केला होता.

शिवसेना उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आम्ही अहोरात्र कष्ट करून, मतदारांच्या विश्वासावर या खासदाराला निवडून आणले होते. परंतु, त्यांनी मतदारांच्या आणि शिवसैनिकांच्या निष्ठेची किंमत शून्य केली. जर ते पदाचा राजीनामा देऊन गेले असते, तर शिवसैनिकांना इतके वाईट वाटले नसते. मात्र, त्यांनी स्वार्थासाठी पाऊल उचलल्याने निष्ठावंत शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या आहेत.

खासदारकीचा राजीनामा न देता पक्षांतर केल्यामुळे हिंगोली लोकसभा मतदारसंघातील जनतेमध्ये आणि शिवसैनिकांमध्ये कमालीचा असंतोष आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित खासदारांना आता हिंगोलीचा विसर पडला आहे. पण ज्या दिवशी ते हिंगोली जिल्ह्यात पाऊल ठेवतील, त्या दिवशी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने त्यांना तीव्र विरोधाला सामोरे जावे लागेल आणि त्यांचे तोंड काळे केले जाईल, असा स्पष्ट आणि आक्रमक इशारा उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. या इशाऱ्यामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नागेश पाटील आष्टीकर यांना इतर समाजासोबतच अल्पसंख्यांक समाजाने मोठ्या प्रमाणात मतदान केले होते. त्यामुळेच निवडणुकीत त्यांना मोठे मताधिक्य मिळाले होते. खा आष्टीकर यांच्या पक्षांतरामुळे अल्पसंख्यांक समाजातही तीव्र नाराजी पसरली आहे.

# शेतकऱ्यांना डीएपी खत उपलब्ध करून देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जून**



क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे यांनी हिंगोली येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मा.कच्छवे साहेब यांची भेट घेऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली व निवेदन सादर केले.

यावेळी हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी तात्काळ डीएपी खत उपलब्ध करून देण्यासाठी बफर स्टॉक रिलीज करण्यात यावा,अशी मागणी करण्यात आली.तसेच भिजलेले अथवा निकृष्ट दर्जाचे खत शेतकऱ्यांना वितरित करू नये,यासाठी कृषी विभागाने विशेष लक्ष देण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय सन २०२४-२५ मधील पीक विमा योजनेअंतर्गत अद्याप विमा रक्कम न मिळालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ न्याय देऊन त्यांची प्रलंबित पीक विमा रक्कम अदा करण्यात यावी, अशी ठाम भूमिका संघटनेच्या वतीने मांडण्यात आली. जिल्ह्यात बोगस जैविक औषधे, खते व बियाण्यांचा वाढता सुळसुळाट रोखण्यासाठी व्यापक तपासणी मोहीम राबवून दोषी आढळणाऱ्या उत्पादक, विक्रेते व संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत गांभीर्याने विचार करून तात्काळ निर्णय घ्यावेत. अन्यथा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र व लक्षवेधी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या भेटीदरम्यान क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे, सेनगाव तालुकाध्यक्ष प्रवीण मते, अमोल एकशिंगे व पवन मोरे उपस्थित होते.



**हिंगोली- राज्यात होणाऱ्या पोलिस भरतीच्या पार्श्वभूमीवर येथील तरूण-तरूणी पोलिस भरतीसाठी तयारी करीत असतांना दिसत आहेत. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पवार पब्लीक स्कूलमध्ये योग दिन साजरा



हिंगोली- शहरातील पवार पब्लिक स्कूल मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योग प्रशिक्षक म्हणून जयस्वाल, खंदारे, कोल्हे यांनी विद्यार्थ्यांकडून योग अभ्यास करून घेतला. यावेळी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक शिवाजीराव पवार, सौ मंदाताई पवार, शाळेचे संचालक प्रणव पवार उपस्थित होते. योग दिनानिमित्त शाळेमध्ये मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये वर्ग चौथी ते दहावी मधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तसेच विद्यार्थ्यांनी योगाचे महत्व पटवून देण्यासाठी आकर्षित पोस्टर तयार केले होते. यावेळी कोमल अग्रवाल, के. सी. सोली, पंकज इंगोले, अश्विनी सराफ, वैशाली सोळंके, अश्विनी बेंगाळ, रुपाली ठाकरे, गजानन वानरे, योगेश थोरात, जोबिन जॉर्ज, सचिन इंगोले, कपिल मस्के, संतोष पाईकराव, गजानन गायकवाड, विष्णू घुगे, वैभव काळे आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# भाजपच्या जनसंपर्क कार्यालयात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जून**



एक देश में दो प्रधान, दो विधान और दो निशान नहीं चलेंगे अशी सिंहगर्जना करत अखंड भारतासाठी आपल्या प्राणांचे सर्वोच्च बलिदान देणारे भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रभक्त डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथी निमित्त हिंगोली येथील भाजप जनसंपर्क कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे व माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या हस्ते डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी देशाच्या एकतेसाठी आणि अखंडतेसाठी उठवलेला प्रखर आवाज व त्यांचे देशाप्रती असलेले सर्वोच्च समर्पण प्रत्येक नागरिकाला सदैव राष्ट्रप्रेमाची प्रेरणा देत राहील, अशा भावना उपस्थित नेत्यांनी व्यक्त केल्या.

याप्रसंगी भाजप जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, जिल्हा प्रवक्ते विलास गोरे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित,नगरसेवक हमीद प्यारेवाले, अ‍ॅड.राजु गोटे, शहर कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, बाबाराव घुगे, समिर भिसे, मनोज शर्मा, सदाशिव सुर्यतळ, सुनिल राठौर, अशिष जयस्वाल, नितीन राठौर, अंकुश जयस्वाल, एकबाल पहेलवालन, चांदु लांडगे, सुरज व्यास, सुनिल शिंदे, राहुल शिंदे, गुड्डू देवकते यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेत निवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबीत, आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जून**

जिल्हा परिषद हिंगोली अंतर्गत सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना दर महिन्याच्या ठराविक तारखेला निवृत्ती वेतन (पेंशन) अदा करण्याबाबत शासनाचे स्पष्ट निर्देश असतानाही प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात विलंब होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. यासंदर्भात निवृत्त कर्मचाऱ्यांच्या वतीने दिलेल्या निवेदनात २ जुलै २०२६ रोजी आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा परिषदेत अनेक निवृत्त कर्मचारी ७० ते ८० वयोगटातील असून त्यांना वेळेवर पेन्शन मिळत नाही. यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. शासनाकडून निधी वेळेत उपलब्ध होत असतानाही प्रशासकीय स्तरावर उदासीनता व दिरंगाईमुळे पेन्शन वितरणात अडथळे येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियमांनुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला निवृत्ती वेतन देणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात तांत्रिक कारणे, कागदपत्रांची पूर्तता न होणे, तसेच कोषागार स्तरावरील विलंब यामुळे पेन्शनधारकांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत.

याशिवाय अनेक निवृत्त कर्मचारी विविध आजारांनी त्रस्त असून त्यांना औषधोपचार, वैद्यकीय तपासणी व इतर खर्च भागविण्यासाठी वेळेवर पेन्शन मिळणे अत्यावश्यक आहे. तरीही संबंधित विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही होत नसल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

निवेदनात काही प्रकरणे विशेषतः नमूद करण्यात आली आहेत. शिक्षण विभागातील एका कर्मचाऱ्याला जून २०१९ पासून निवृत्ती लाभ मिळालेले नाहीत, तर इतर काही कर्मचाऱ्यांच्या विमा व इतर योजनांच्या रकमा अद्याप प्रलंबित आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून निवृत्ती वेतन नियमित व वेळेत देण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा येत्या २ जुलैपासून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवृत्त कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# हिंगोलीत महेश नवमी महोत्सव उत्साहात साजरा, औंढ्यात नागनाथाला लघुरूद्राभिषेक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जून**







माहेश्वरी वंशाची उत्पत्ती असलेल्या पावन महेश नवमी उत्सवाचे औचित्य साधून यावर्षी माहेश्वरी युवा संघटन, हिंगोली द्वारे महिनाभरापेक्षा जास्त काळ चालणाऱ्या विविध सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि पर्यावरणपूरक कार्यक्रमांचे अत्यंत भव्य व यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

माहेश्वरी समाज नेहमीच 'सेवा, त्याग आणि सदाचार' या त्रिसूत्रीचा अंगीकार करून सामाजिक कार्यात अग्रेसर राहिला आहे. या परंपरेला अधिक समृद्ध करत, चालू वर्षी संघटनने समाजात 'संस्कार, शिक्षण आणि व्यापार' या तीन मूल्यांना विशेष चालना देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या महोत्सवांतर्गत १५ मे २०२६ ते २३ जून २०२६ या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात आले. महोत्सवाची सुरुवात १५, १६ आणि १७ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या रोमांचक बॉक्स क्रिकेट स्पर्धेने झाली. त्यानंतर २१ जून रोजी युवा, पुरुष, युवती, महिला आणि लहान मुलांसाठी स्वतंत्र बॅडमिंटन स्पर्धा, कॅरम स्पर्धा आणि बुद्धिबळ (चेस) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये अबालवृद्धांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

३१ मे रोजी तरुणाईच्या बुद्धीला आणि कौशल्याला आव्हान देणारी ट्रेझर हंट ही थरारक स्पर्धा पार पडली. या स्पर्धेसोबतच पर्यावरण रक्षणाचा सामाजिक संदेश देत शहरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच, समाजबांधवांच्या वैचारिक विकासासाठी एका निबंध स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते, ज्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २१ जून रोजी महेश उद्यान, तापडिया इस्टेट येथे एका भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक बांधिलकीच्या कार्यात समाजातील तब्बल ७० रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून मानवतेचा आदर्श घालून दिला. २२ जून रोजी जीवदयेचा संदेश देत गो-सेवा प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत 'गोपाल लाल मंदिर गोशाळेत' जाऊन सर्व गोवंशाला सरकी ढेप आणि हिरवा चारा खाऊ घालण्यात आला.

महेश नवमीच्या मुख्य दिवशी माहेश्वरी भवन ते महेश चौक दरम्यान अत्यंत देखणी आणि भव्य शोभायात्रा काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेतील समाजबांधव आणि 'जय महेश'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. वर्ष २०२६ मधील इयत्ता १० वी, १२ वी, पदवी आणि इतर क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा 'गुणगौरव सत्कार' करून त्यांना सन्मानित करण्यात आले. भक्तीमय वातावरणात संगीतमय महेश वंदनेचे सादरीकरण करण्यात आले.कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली.

हा महिनाभर चाललेला भव्य महोत्सव यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी युवा संघटन आणि माहेश्वरी युवती मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यांच्या सामूहिक योगदानामुळेच सर्व कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहात पार पडले.

औंढा नागनाथ येथे बारा ज्योतिर्लिंगापैकी आठव्या स्थानावर असलेल्या प्रभु नागनाथास माहेश्वरी समाजाच्यावतीने मंगळवारी (ता.२३) रोजी लघुरुद्र अभिषेक करण्यात आला. महेश नवमीनिमित्ताने आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूस लघुरुद्र व दुग्धभिषेक करण्यात आला. श्रीक्षेत्र औंढा नागनाथ माहेश्वरी समाज ग्रामसभा तालुकाध्यक्ष निलेश सारडा व स्नेहा सारडा यांनी ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभू लघुरुद्र अभिषेक व महापूजा करून प्रभू नागनाथास समाजाची प्रगती व उज्वल भविष्यासाठी साकडे घातले.

हर हर महादेव, बम बम बोले, नागनाथ महाराज की जय या जयघोषाने नागनाथ मंदिर परिसर दुमदुमून गेला. लघुरुद्र अभिषेक करताना औंढा नागनाथ माहेश्वरीसमाज ग्रामसभा तालुकाध्यक्ष निलेश सारडा, युवा तालुकाध्यक्ष आदित्य मालपाणी, श्रीराम राठी, शैलेश सारडा, द्वारकादास सारडा, श्रीनिवास राठी, डॉ प्रदीप सोनी, डॉ.प्रवीण सोनी, गोविंद भूतड़ा, संदेश सारडा, वैभव राठी, आनंद लढा, सतीश भूतड़ा, विजय राठी, पराग झवर, योगेश सारडा, संजोग सोनी, पीयूष भूतड़ा, गोविंद बिदादा, मीना राठी, स्नेहा सारडा, अर्चना सारडा, शिल्पा राठी, पूनम लढा, दीपा सारडा, अश्विनी मालपाणी, वेदिका राठी, कोमल सोनी, दिपाली सोनी वैभव राठी, कोमल सोनी यांच्यासह माहेश्वरी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.